

# श्री साईलीला

बर किं. ५० पैसे १

# या अंकांत—

१ श्रीसंत नामदेवांचें पुण्यस्मरण
२ ‘ ज्ञानदीप लावूं जगीं ’
३ श्रीसाईबाबा पुण्यतिथी महोत्सव
४ गीतेचें सारभूत मार्गदर्शन
५ श्रीनामदेव महाराज केळकर
६ मनांत आलं कीं—
७ ‘ ब्रह्मरस घेईं काढा ’
८ एका साईभक्त महिलेचा अनुभव
९ श्रीरामकृष्ण महाराज जांभेकर
१० तीन महत्त्वाचीं स्तोत्रें-विठोबा, श्रीराम व श्रीकृष्ण
११ वाचकांचा पत्रव्यवहार
१२ स्वामी विवेकानंद यांचें महत्त्वाचें पत्र
१३ शिरडी-वृत्त



# श्री साई वाक्सुधा

मनुष्यप्राणी जन्माला येतो तेव्हांपासून त्याचा मृत्यूच्या मार्गानें प्रवास सुरू असतो. आज उद्यां की परवा त्याची भेटगाठ कधीतरी व्हायचीच. मी या जगात अमरपट्टा घेऊन आलो आहें असें कोणीही समजू नये. तेव्हा प्रत्येकानें मरणाचें स्मरण अहर्निश ठेवावें. आपला हा देह म्हणजे काळाचे भक्ष्य आहे. प्रपंचांत वावरत असता याची आपण सतत आठवण ठेवावी व नेहमी अत्यंत सावधानतेने वागावे.

—श्रीसाईसच्चरित

---


श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक. ]

वर्ष ४९ वें ] डिसेंबर १९७० [ अंक ९ वा

: संपादक :

**श्री. का. सी. पाठक**

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

**टे. नं. ४४३३६१**

: कार्यालय :

**साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट न. ८०४ बी, दादर, मुंबई १४**

# श्री संत नामदेवांचें पुण्यस्मरण

**प्रिय वाचक--**

संतश्रेष्ठ श्री नामदेव यांची सप्तशताब्दि सध्यां भारतभर मोठ्या समारोहाने नि भक्तिभावपूर्वक पाळली जात आहे. या पुण्यस्मरणाचे आत्यंतिक महत्व लक्षांत घेऊन सरकारही त्यांत संपूर्णपणे सामील झाले आहे. नामदेवाच्या मानाने पहाता संत तुकाराम किंवा समर्थ रामदास यांस अलिकडच्या म्हणजे तीन साडेतीनशें वर्षे पूर्वीच्या काळांतील सत्पुरुष म्हणतां येईल. त्यानीं जनतेंत भक्तिभावाची गुढी उभारून जनजागृतीचें जें कार्य केलें त्याची तुलना होऊं शकणार नाही परंतु तत्पूर्वी सुमारें चारशे वर्षांपूर्वीच्या काळांत संत नामदेवानीं केवळ महाराष्ट्रांतच नव्हे तर अखिल भारतभर हिंडून फिरून व जरूर तेथें दीर्घकाळ वास्तव्य करून जनतेंत भक्तिभाव, ऐक्य व प्रेमभाव निर्माण करण्याचे जें कार्य केले ते अतुलनीय तसेंच सातशे वर्षांचा काळ लोटला तरी अविस्मरणीय होऊन राहिले आहे.

'संत म्हणती नामा आला ! हरिनामाचा सुकाळ झाला ॥' त्रिवार सत्य आहे. हरिनामाचा जनतेत सुकाळ करणे हे सर्वांच्या शाश्वत कल्याणाच्या दृष्टीनें महत्तम कार्य होते आणि ते जीवनभर त्याच कार्याला वाहून घेऊन संत नामदेवांनी प्रभावीपणे पार पाडले. त्यासाठी त्यांनी कीर्तनाची कास धरली आणि तें साधन त्यांनी परिणामकारक रीतीनें वापरले. 'नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी,' संत नामदेव कीर्तनांत इतके रंगून जात असत व श्रोत्यांनाही इतके काही रंगवून सोडीत असत कीं कीर्तनानंदांत ते स्वतः नाचत व श्रोत्यानाहीं नाचवीत असत. जनमनावर केवढा हा त्यांच्या वाणीचा प्रभाव. परंतु एवढ्यानें काय झाले ? 'नामदेव कीर्तन करी, पुढें देव नाचे पांडुरंग॥' ज्याच्या अमोघ व प्रभावी वाणीला भाळून प्रत्यक्ष भगवंत नाचूं लागत असत, तेव्हा त्या कीर्तनसोहळ्याचें माहात्म्य आम्ही कोणत्या शब्दांनी गावें ?

हरिनामाचा सुकाळ करून सोडणें ही मानव जातीच्या कल्याणाची गोष्ट आहे. श्री संत नामदेवांनी ती बरोबर ओळखली होती व म्हणूनच तर त्यानी तेच आपले

जीवन कार्य ठरवून आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत ते कर्तव्य पार पाडण्यात जीवनाची इतिकर्तव्यता मानिली. 'संत म्हणती नामा आला । हरिनामाचा सुकाळ झाला' हा सुकाळ त्यानी केवळ आपल्या काळात घडवून आणिला असें नसून त्या काळाला सातशे वर्षे होऊन गेली असलीं तरी आजही तो सुकाळ अखंड चालूच आहे. संत नामदेवांच्या अमोघ वाणीचा केवढा हा प्रभाव !

या श्रेष्ठ संताच्या कार्याचें महत्त्व आम्ही कोठवर सांगावे ? सर्वांना तें पटलें आहे. त्यांच्या सप्तशताब्दीच्या निमित्ताने त्या थोर संताचे माहात्म्य आज आपण गात आहोत. व पुढेंही गात राहू. परंतु तें महत्त्व १०।१२ वर्षांपूर्वी पुरेपुर ओळखून श्री संत नामदेव वाङ्मयाचे व त्याच्या कार्यांचे व्यासंगी भक्त श्री. ग. वि. कविटकर यांच्या सहकाराने त्यांच्या कार्यांचे गुण संकीर्तन श्रीसाईलीलेने सतत चालविलें आहे. या अखंड सहकाराबद्दल श्री. कविटकर यांस आमचे वाचक धन्यवाद दिल्याशिवाय रहाणार नाहींत.

संपादक

# ज्ञानदीप लावूं जगीं

लेखक : गणेश विष्णू कविटकर. एम्. ए.

( लेखांक तिसरा )

त्यानंतर नामदेव अमृतसर नजीक २५ मैलांवर गुरुदासपूर जिल्ह्यांतील एका जंगलातील रमणीय तलावाजवळ वस्तीस येऊन राहिले. नामदेवांच्या सान्निध्यांत या जंगलाचा संपूर्ण कायापालट झाला. तेथें एक गांव वसले. फिरत फिरत या ठिकाणीं नामदेव गेले म्हणून त्यांनीं त्या वस्तीस घुमान असें नांव दिलें. या गांवाला निसर्गाचा वरदहस्त पुरेपूर लाभलेला आहे. भोंवतालची वृक्षराजी, त्यावर असणारे मोर, पोपट, मैना, चक्रवाक इत्यादि पक्षी प्रवाशांचे लक्ष चटकन् वेधून घेतात. या घुमान गावालगत तीन मोठे पाण्याचे तलाव आहेत. त्या तळ्यांचाहि नामदेवांच्या शिष्यामध्यें प्रसिद्ध असलेला केशो हा त्यांना मिळाला. केशो अविवाहित होता. त्यामुळें त्यास केशो कलंधर असेहि म्हणत. तारा नामक गांवचा तो धनी होता. महारोग झाल्याकारणानें जिवास कंटाळून आत्महत्या करण्याच्या तो विचारांत होता. त्यावेळीं कोणी त्यास श्रीसंत नामदेवाकडे जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें घुमान येथें जाऊन नामदेवांच्या चरणीं तो लागला. नामदेवांना त्याची दया येऊन त्यास मनोमन देवाचें स्मरण करून त्या तळयात त्यांनी स्नान करण्यास सांगितले. त्याप्रमाणें त्या तळयांत स्नान करीत राहिल्यामुळें त्याचा महारोग संपूर्ण बरा झाला. यापुढें तो नामदेवांच्या सेवेला राहूं लागला. एकदां सहज नामदेवांनी या शिष्यास विचारले, " बेटा ! तुला रोज भजनास येण्यास कां वेळ होतो ? त्या शिष्यानें त्यांना आपणास स्नानास पाणी मिळण्यास फार अडचण पडत असते असें सांगितलें. शिष्याचें म्हणणे नामदेवांना पटले व त्यांनी आपल्या बैठकीच्या मागच्या बाजूला आणखी एक तलाव खणला; व शिष्यवर्गाची कायम सोय केली. केसो कलंधर हा भावलपूर

संस्थानांत भागवत धर्माची शिकवण देत असे. भावलपूर येथें त्याचा आश्रम असून त्याची समाधीहिं तेथें आहे. त्याचा आश्रम "कलंधारी की गद्दी" या नांवानें ओळखला जातो. भावलपूर हे विभाजनाच्या वेळी पाकिस्तानांत गेले.

घुमान येथे नामदेवांचे वास्तव्य सुमारे १० वर्षें म्हणजे शके १२७१ पर्यंत होते. पंढरपुरास जाण्याकरितां घुमानहून मकरसंक्रांतीच्या दिवशीं नामदेवांनी प्रयाण केले. म्हणून तेथे प्रतिवर्षी माघ शुद्ध २ रोजी महायात्रा भरत असते. पंढरपूरास शके १२७२ मध्यें येऊन विकृत संवत्सर आषाढ व. १३ रोजी पांडुरंगाचे चरणाजवळ त्यानी आपली जीवनज्योती परमात्म्यांत विलीन केली. अशाप्रकारे या मध्ययुगीन भारताच्या थोर व क्रियाशील भक्ताची त्याठिकाणीं अवतारसमाप्ति झाली. नामदेवांच्या परिवारांत त्यांच्यामागून जन्मलेले आणि त्यांच्या कडून स्फूर्ती घेणारे निर्गुण संत कबीरदास, हिन्दु—मुस्लिम ऐक्य घडवून आणणारे महान् तत्वदर्शी श्रीगुरु नानक, तसेच नामदेवांकडून काव्यस्फूर्ती लाभलेले तुकाराम हीं नावें भारताल अविस्मरणीय आहेत.

## परिशिष्ट 'अ'

# राजस्थानातील प्रमुख संस्था

(१) श्रीनामदेव समाज जागृती संघ, रास्ता जाटका कुआ, जयपूर, (राजस्थान)

(२) अखिल भारतीय क्षत्रिय महासभा, सूरसमुदाय संत श्रीनामदेव अनुयायी १८ श्रीराम मॅन्शन, ५५७ एडनवालारोड, माटुंगा, बम्बई १९.

(३) श्रीनामदेव समाज, रास्ता जाटका कुआ, जयपूर, (राजस्थान)

(४) श्रीनामदेव समाज पत्रिका, रास्ता जाट का कुआ, पुरानी वस्ती, सीतारामजीका मन्दिर, जयपूर, (राजस्थान)

(५) श्रीनामदेव समाज, युवक-मंडळ, श्रीनामदेव भवन, अशोक चौक, टोंक (राजस्थान)

(६) श्रीनामदेव समाज, सवाई माधोपूर (राजस्थान)

(७) श्रेष्ठी समाज (संत नामदेव अनुयायी) श्रेष्ठी संस्थान, मुंदडी मोहल्ला, अजमेर (राजस्थान)

(८) श्रीनामदेव समाज, कोटा, (राजस्थान)
(९) श्रीनामदेव विद्यार्थी परिषद, श्रीनामदेव भवन, टोक (राजस्थान)

अशा प्रकारच्या वरील संस्था राजस्थानांत नामदेव समाज विकास मंडळाच्या स्वरूपांत कार्य करीत आहेत. या संस्थांव्यतिरिक्त आणखी कांही मोठ्या संस्थांची नावे अशीः—

(१) श्रीनामदेव जागृति संघ, सांगानेर, जिला जयपूर (राजस्थान)
(२) श्रीनामदेव जागृति संघ, बगरू, जिला जयपूर (राजस्थान)
(३) श्रीनामदेव समाज जागृति संघ बरनी, जिला जयपूर (राजस्थान)
(४) श्रीनामदेव समाज, करोली.
(५) श्रीनामदेव समाज सभा, अजमेर.
(६) श्रीनामदेव नवयुवक मंडळ, केकडी, जिला अजमेर (राजस्थान)

इत्यादी संस्था राजस्थानात नामदेवाचा संदेश अंतःकरणांत ठेवून समाजाची प्रगति करीत आहेत.

---

# श्री साईबाबा पुण्यतिथी महोत्सव
## [ ५२ वी पुण्यतिथी ]

श्रीसाईबाबा महाराज यांचा पुण्यतिथी महोत्सव आश्वीन शु. १० शके १८९२ या दिवशी श्रीसाईसमाधि मंदिरांत मोठ्या थाटात झाला. उत्सवाचे तयारी-करिता अगोदर खातेप्रमुखांची मिटिंग मे. मिरीकरसाहेब (ॲ. स्टे. ऑ.) यांचे अध्यक्षतेखाली भरून कोणी काय काय काम करावयाचे हें ठरविण्यांत आलें. प्रथम भक्त उतरण्याच्या सर्व खोल्या (डी. डी. टी.) चे फवारे मारून स्वच्छ करणें व उत्सवाकरितां जादा माणसें नेमणें हें काम सॅनिटेशन खाते प्रमुख श्री. सालकर यांनी करावयाचे. दिवाबत्ती विजेच्या दिव्यांची रोषणाई व लाऊडस्पीकरची व्यवस्था या कामाकरितां जादा माणसें नेमणें हें काम पॉवरहौस खातेप्रमुख श्री. वसंतराव कुलकर्णी यांनी करावयाचे. उत्सवाकरितां मांडव घालण्याचे काम इमारतखाते प्रमुख श्री. पाटीलसाहेब यांनी करावयाचे. आराधनाविधी, स्वयंपाक व्यवस्था, नैवेद्य, गृहखाते प्रमुख श्री. बाकलीवाल यानी करावयाचे. उत्सवानिमित्त मंदिरात जादा माणसें

नेमणेचें काम मंदिरखातें प्रमुख श्री. बागवे व श्री. दिगंबर जाखडी यांनी करावयाचे, उत्सवात २४ तास पोथी पठण व्यवस्था ऑफीस अकौंटंट मे. नागपुरेसाहेब यांनी करावयाची. प्रसादरूपाने कापडविक्री श्री. बाकलीवाल–यांनी कारकून मदतीसह करावयाची. भक्तांना उतरण्याची चौकशी ऑफिसप्रमुख श्री. प्रभाकर नागपुरे यांनी करावयाची [ गायनवादन कीर्तन कलाकारांना संभावना देणे ] हे काम कलाकार प्रमुख श्री विठ्ठलराव मराठे यांनी करावयाचे व आराधना विधीची तयारी महिर प्रमुख श्री. जाखडी व मराठे यांनी करावयाची उत्सवांत फराळ व भोजनावर देखरेख करण्याची व्यवस्था श्री. खोत यानी करावयाची. वाजंत्री बँड चौघडा वगैरे जादा वाजंत्र्याची व्यवस्था श्री. सालकर यांनी करावयाची संरक्षण विभाग खाते श्री. एकनाथ कोते यानी जादा माणसे नेमून व्यवस्था करावयाची. येणे प्रमाणे कामाची व्यवस्था होऊन कामास सुरुवात झाली.

उत्सव तीन दिवस होतो; पण यावेळी चार दिवस झाला. याचे कारण नवमी, दशमी, एकादशी व द्वादशी ( स्मार्त व भागवत अशा दोन एकादश्या आल्यास ) हा उत्सव तीन दिवसाचा होतो. मंदिरात दुसरी एकादशी धरली जाते. गोपाळकाला पहिल्या एकादशीस होऊन उत्सव तीनच दिवसात संपतो अशी वहिवाट आहे.

उत्सवांत यावर्षी गर्दी बरीच कमी प्रमाणात होती. मुंबई, पुणे, मद्रास, आंध्र, नागपुर वगैरे ठिकाणाहून भक्तलोक आले होते.

## उत्सवकार्यक्रम

दिनांक ९।१०।७० शुक्रवार रोजीं नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींचे फोटो व श्रींच्या चरित्र ग्रंथाची मिरवणूक दुपारी ४ ते ६ पर्यंत संस्थान गवई श्रीविठ्ठलराव मराठे यांचें कीर्तन, रात्रौ श्रीचे पालखीची गांवातून मिरवणूक.

दिनांक १०।१०।७० शनिवारी रोजी नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त श्रीचे फोटो व श्रीच्या चरित्र ग्रंथाची मिरणुक सकाळी ११ ते १२ पर्यंत श्री विठ्ठलराव मराठे संस्थान गवई यांचे श्री साईबाबापुण्यतिथी व्याख्यानावर कीर्तन, दुपारी आरतीनंतर आराधनाविधी मे. मिरीकर, याचे हस्तें झाला. सायंकाली सीमोल्लंघन मिरवणूक, रात्री श्रीचे रथाची गांवांतून मिरवणूक गारुड, भारुड, भजनी दिंडीसह नंतर रात्रभर कलाकारांच्या हजेऱ्या गायन, वादन, नकला, वगैरे रात्रभर मंदिर भक्तांना दर्शनासाठी

खुलें. कलाकार एकूण पस्तीस झाले. यात कु. लीला बाळकृष्ण शेलार मु. ठाणे हिचा कार्यक्रम फारच चांगला झाला. बाकीचे सर्व ग्रामस्थ होते.

दिनांक ११-१०-७० रविवार या दिवशी नित्य कार्यक्रमाव्वतिरिक्त साकोरी येथील श्रीसंत उपासनी महाराज याचे आश्रमातील कन्या कुमारी यांचे दुपारी ४ ते ६ पर्यंत सुश्राव्य सुंदर गोड आवाजात भजन झालें. हा कार्यक्रम सर्वभक्ताना विशेष आवडला. रात्रौ. ७ ते १० वाजेपर्यंत ह. भ. प. लक्ष्मण बुवा वाघचौरे मु. शिर्डी याचे कीर्तन ( वारकरी पद्धतीचे ) झाले.


दिनांक १२-१०-७० सोमवाररोजीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळीं ११ते१२ पर्यंत गोपाळकाला कीर्तन दहीहंडी होऊन उत्सव समाप्त झाला. उत्सवाचे चार दिवस प्रसादरूपाने कापडविक्री करण्यात आली. सर्व नोकर सेवेकरी याना तीन दिवस लाडू, चिवडा, फराळ व एक दिवस श्रमपरिहारार्थ पक्वान्नाचे भोजन संस्थान तर्फे देण्यात आले. भक्तानाही उत्सवानिमित्त तीन दिवस नेहमीच्या दरात मिष्टान्नाचे जेवण संस्थानतर्फे देण्यात आले. येणे प्रमाणे कार्यक्रम होऊन उत्सव समाप्त झाला.

# गीतेचें सारभूत मार्गदर्शन

(लेखांक ५ वा).

लेखक—डॉ. रा. य. परांजपे, (रत्नागिरी)

**श्लोक— मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।**
**मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे** ॥ गी. श्लोक. १८/६५



या श्लोकांतील 'मन्मना भव' या पदाचा स्पष्ट अर्थ ध्यानीं यावा म्हणून गीतेच्या बाराव्या अध्यायापर्यंत आपण आलोचन केलें एकंदर विचार मंथनांतून 'भगवान' म्हटल्याबरोबर आपल्यापुढें आतां आद्य असें अनाद्यनंत तत्त्व, विश्वाकार आणि सगुण साकार, असा श्रीहरीच ध्यानीं यावा हें स्वाभाविक आहे. ज्ञानोबांनीं हाच भाव ध्यानीं घेऊन या श्लोकाचा भावार्थ वर्णन केला आहे. हें त्यांच्या विवेचनांतून आपण पाहूं शकतो. या श्लोकावरील ज्ञानोबांची पहिलीच ओवी अशी आहे.

**'तरी बाह्य आणि अंतरा । आपुलिया सर्व व्यापारा ।**
**मज व्यापकातें वीरा । विषयो करीं ॥**

भगवान म्हणतात– अर्जुना, तुझे जे कांही अंतर्बाह्य व्यापार होतील त्या सर्व व्यापारांना मी व्यापक असल्यामुळे मीच विषय कर. आतां बाह्य आणि आंतर व्यापार कोणते असा प्रश्न स्वाभाविकच उत्पन्न होतो. त्याचे उत्तर ज्ञानोबांच्या पुढील ओंव्यांतून सहजच मिळणार आहे. येथे भगवंतांनी आपल्याला 'व्यापक' असे म्हटले आहे.

याचा अर्थ काय ? भगवान व्यापक आहेत असें म्हटले म्हणजे व्याप्य काय ? त्यांनी काय व्यापले ? व्याप्य निराळे आणि व्यापक निराळे असें मानले म्हणजे मूर्तिमंत द्वैतच उभे रहाते. आणि भगवान स्वतःविषयीं असा एकदेशी भाव धरणे पसंत करीत नाहींत. सोन्याचे मणि सोन्याच्याच सुतांत ओवावे त्याप्रमाणे जग आणि जगाच्या अंतर्बाह्य एक परमात्माच आहे. म्हणून येथे व्यापक याचा अर्थ व्याप्य व्यापक सर्व तोच असा केला पाहिजे. त्याचे व्यापकत्व व्याप्य आणि व्यापक या कल्पनेलाहि व्यापून आहे. "**शून्य स्थावर जंगम ॥ व्यापून राहिला अकळ। बाप रखुमादेवीवरु, विठ्ठल सकळ ॥**" असें ज्ञानोबांनी भगवंताचे सुंदर वर्णन केले आहे. हेच वर्णन या ठिकाणीं विचारात घेणे आवश्यक आहे. व्याप्य आणि व्यापक या कल्पनांच्या पलीकडे तो अकळ म्हणजे आपल्या कळण्याच्या पलीकडे आहे. अर्थात त्याचे व्यापकत्व इतके असणें आवश्यक आहे. ही धारणा असली म्हणजे आपल्या कायिक, वाचिक व विशाल आहे, अशा परमेश्वराला आपण विषय करावयचा म्हणजे आपण विषयी झालो. आणि सर्व कांहीं तोच असल्यानें मी विषयी असें वाटलें तरी वस्तूः विषयी देखील तोच हें सहजच ध्यानीं घेणे आवश्यक आहे. हा आशय पूर्णपणें ध्यानी आला तर पुढील ओव्यांचा अर्थ यथार्थ लागू शकेल. या पुढील ओंवी अशी आहे.

**आघवां आंगी जैसा ! वायु मिळोनि आहे आकाशा !**
**तू सर्वकर्मी तैसा ! मजसीचिं असें ॥**

व्यापकाला विषय कसा करावा याचें उत्तम उदाहरण आकाश आणि वायु यांचें दिलें आहे. वायु हा आकाशांतच नांदत असल्याने त्याच्या आंत व बाहेर आकाशंच असतें. त्याच प्रमाणें आपणहि त्या व्यापक परमात्म्यांतच नांदत असल्यानें आपल्या आंत बाहेर सर्व तोच आहे. त्याच प्रमाणें भासमान होणारें द्वैत वस्तुतः अद्वैतरूपच आहे. हें आकाश आणि वायु या दृष्टांतानी स्पष्ट केलें आहे. वायूची उत्पत्ति आकाशापासूनच आहे. भेदांत वास्तविक अभेदच आहे. त्याच प्रमाणें आपला मीपणा हा देखील भगवत् सत्तेचाच एक अविभाज्य भाग आहे जें कांहीं पाहिजे आहे ते म्हणजे अशी दृढ धारणा मानसिक सर्व कर्माचा संबन्ध परमेश्वराशीच निगडित होता. मग भगवद्भजन म्हणून अमूक कर्में केलीं पाहिजेत असें उरतच नाही. कांही करणें आणि न करणें ही दोन्हीहि भगवद्भक्तीचीच अंगें होतील. अहंकारपूर्वक केलेलीं सर्वच साधने

भक्तीला विरोधी म्हणून भगवत्प्राप्तीच्या आड येतात. परंतु तींच साधने भगवन्ताच्या व्यापक बोधाने भक्तिरूप होतात. पूजा, अर्चा, ध्यानधारणा, जपतप, योगयाग, नामस्मरण, चिंतन यांपैकी भक्ताने आवडीनुरूप कोणतेहि साधन केलें तरी ते भक्ती या सदरांतच मोडते. सर्व कर्माचा भगवन्त कर्ता ही दृढ धारणा असली म्हणजे "भक्ताचे कर्म सकळ। अर्पे तत्काळ भगवन्ती असे। होते. वायु जसा आकाशांत उत्पन्न होतो आकाशांत नांदतो, त्याचे पाठीपोटीं एक आकाशच असते. तो कोठून कोठेंहि गेला तरी आकाशाबाहेर जात नाही त्या प्रमाणें भगवान म्हणतात.

'तू सर्व कर्मीं तैसा। मजसीचि असें'

भगवद्भक्तीचे हें स्वरूप अत्यंत सुलभ आणि सहज असें आहे. परंतु याचा बोध योग्य त्याप्रकारें स्थिर झाला नाही म्हणजे ही भक्तीसुद्धां फार अवघड आहे असें वाटू लागतें. बहुतेक साधक अशी कल्पना करून घेतात कीं, या बोधाचें वृत्तिरूप स्मरण अखंड ठेवणें आवश्यक आहे. आणि मग तसा प्रयत्न सुरू होतो. मनाचा धर्म तर याला सर्वस्वी विरोधी आहे. अनेक प्रकारचे संकल्प आणि विकल्प करीत रहाणें हा मनाचा सहज धर्म आहे. त्यामुळें मनानें सातत्याने एकाच प्रकारचें चिंतन करण्याचा हव्यास बाळगणें फोल ठरतें. मनानें असें सतत चिंतन करतां आलें नाहीं म्हणजे साधक बेचैन होतो. त्याला आपण साधनेनें कमी पडतो असें वाटू लागतें. त्याची धडपड तर त्या दिशेने चालूच रहाते आणि वारंवार निराशा पदरांत पडते. मग आपण तितके अधिकारी नाहीं असें तो मानू लागतो. अशा प्रकारें सुलभ आणि सदैव आनंददायी भक्तिमार्ग त्याला कठीण आणि त्रासदायक वाटू लागतो. जेवढा वेळ वृत्तिरूप स्मरण राहील तेवढा वेळ तो आनंदांत असतो. अशा प्रकारे आशा–निराशेचे हेलकावे खात त्याचा परमार्थ चालू रहातो. मूलभूत वैचारिक धारणेत असणारी चूक त्याच्या लक्षांत येणें शक्य नसते. ही चूक कोणती याचाच आतां विचार करणें आवश्यक आहे.

'सर्वकर्मीं तैसा मजसीचि असें' याचा अर्थ सर्व कर्में करीत असतां वृत्तिरूपानें स्मरण ठेवणें असा नाही. वृत्तिरूप स्मरण हें अखंड राहूंच शकत नाही. वृत्तिरूप स्मरण हें वारंवार होणारें स्मरण असू शकतें. परंतु एकदां स्मरण व पुन्हा स्मरण या मध्यें खंड हा राहतोच. स्मरणानंतर विस्मरण व पुन्हा स्मरण अशी मालिकाच

चालू असते. जीवनांत अशीं अनेक प्रकारची स्मरणें एका मागून एक होतच असतात. व तशी तीं न होतील तर आपले जीवनच चालणार नाही. आतां स्मरण म्हणजे तरी काय ? जी गोष्ट आपल्याला पूर्वीच ज्ञात आहे तिची आठवण होणें. विसरलेल्या गोष्टीची आठवण होणें यालाहि आपण स्मरण असे म्हणतो परंतु विसर याचाच अर्थ पूर्वी त्या गोष्टीचें स्मरण होते असाच होतो. म्हणजेच स्मरण आणि विस्मरण या पूर्वीच आपल्याला ज्ञात अशी गोष्ट असते. आतां या ज्ञात असणाऱ्या गोष्टी अनंत असल्या तरी त्यांचा ज्ञाता हा एकच आहे. अनंत प्रकारच्या ज्ञात गोष्टीच्या ज्ञानानें किंवा स्मरणाने आपल्या अखंड ज्ञातेपणाचाच वारंवार भोग घडतो. हा जो सर्वांचा ज्ञाता तोच ज्ञानस्वरूप श्रीहरि आपल्या हृदय-मंदिरांत विराजमान आहे. म्हणून क्रियामात्रांत ज्ञेय रूपाने आणि ज्ञाता या रूपाने दोन्हीची सिद्धि सहजच प्रत्ययरूप आहे. सहज भक्तीचा गाभा म्हणजे ही मूलभूत स्मृतीच होय. ज्ञानोबांनी या स्मृतीचा असाच अर्थ केला आहे.

**देखिलेनि पदार्थें । जे आठवूनि दे मातें ।**
**ते स्मृतिही येथें । त्रिशुद्धी मी ॥ज्ञा १० / २७८**

प्रत्येक पदार्थ पाहिल्याबरोबर भगवंताचीच आठवण होणे यालाच स्मृति म्हणावे. आपल्याला तर पदार्थ पाहिल्याबरोबर त्या पदार्थाचीच स्मृति होते. आंबा दिसला की आंब्याचीच स्मृति होते. दुसरी कसली स्मृति होत नाही. फार झालें तर आंब्याची जात कोणती, हापूस, पायरी का आणखी कोणत्या जातीचा आहे हे आठवतें. येथें भगवंताची स्मृति होणे म्हणजे काय ? बरे आंबा पहातांच भगवंताची स्मृति झाली तर आंबा हा भगवंताचे स्मरण करून देणारा स्मारक ठरेल त्या प्रमाणे सर्व विश्व हे भगवंताची आठवण करून देणारे स्मारकच ठरणार. एखादी मूर्ति दिसली तरी तेही भगवंताचे स्मारकच ठरणार. अशा प्रकारे स्मारकें अनंत परंतु ज्याचें स्मरण व्हावयाचें तो मात्र एकच! आणि स्मरण होणाराहि एकच ! बरे अशा भगवंताचे स्मरण तरी केव्हां शक्य आहे ? जर त्यानें पूर्वी पाहिला असला तरच आणि त्या पदार्थाशी त्याचा अविभाज्य संबंध ज्ञात असेल तरच हे सर्व शक्य आहे. भगवान दुसऱ्याला ज्ञात होणारे नाहींत कारण ते असंवेद्य आहेत हें आपण पाहिले आहे. अशा भगवंताचे स्मरण तरी त्याचें त्यालाच शक्य आहे. म्हणून परमेश्वर हे जर आपलें ज्ञेय ठरविलें तर ज्ञाता आणि ज्ञेय यांत फरक असतां, भगवंत आकळला जाणार नाही. आणि भगवतांनी देवभक्तांचें मूळचें अनादि ऐक्यच प्रतिपादन केलें आहे. याप्रमाणें पहातां

देवभक्त आणि विश्व यांचे अनादि ऐक्यच आहे. येथें द्वैताचा भास म्हणजे अद्वैताचा विलास! पदार्थमात्राचें दर्शन म्हणजे प्रत्यक्ष भगवंताचेच दर्शन पदार्थ स्मारक नसून तेंच प्रत्यक्ष भगवताचें दर्शन आहे. प्रत्येक दर्शन. भगवद्दर्शन झाल्यामुळें आपल्या सर्व व्यापाराला भगवंतच विषय झाला. हाच बाह्य आणि अंतरा। आपुलीया सर्व पारा ॥ मज व्यापकानें वीरा। विषया करी ॥ या ओवीचा भावार्थ आहे. आणि पुढील सर्व कर्मी तैसा। मजसीचिं असे ॥ या ओवीनेहि हाच भव अधिक स्पष्ट केलेला आहे. या दोन ओव्यांत अध्याय नऊ दहा आणि अकरा यांतील व्यापक बोधाशीं होणारें सहज भजन दयत केलें आहे. भजनाचा ज्ञानप्रधान असा हा प्रकार आहे. परंतु भक्तीमध्यें ज्ञानाचें अंग असलेली परंतु प्रेमप्रधान भक्ति हीच भगवंताला अत्यंत प्रिय आहे. बाराव्या अध्यायांत अशाच भक्तीचे कोडकौतुकाने गुणगान केलेले आहे. हा महत्वाचा भाग ज्ञानोबांनी पुढील कांही ओव्यांत विशद केला आहे. अनुक्रमाने त्यांचा विचार करू.

'किंबहुना आपले मन। करी माझे एकायतन।
माझेनि श्रवणें कान। भरोनि घालीं ॥

आपल्या हातून होणारी प्रत्येक क्रिया ही प्रथभ मनांतूनच उगम पावत असते.

आवडे ते गोष्टी किरीटी। सर्वथा मनौनीचि उठी।
मग ते वाचे दिठी। करासि ये ॥

यासाठी मनांतच भगवन्ताला अढळ स्थान—एकायतन-प्राप्त झाले म्हणजे क्रियामावें त्याचेच भजन होईल.

नाथ—भागवंतात नाथांनी असेंच वर्णन केले आहे.

'मनी प्रकटला श्रीहरी। अति निःसीम निजबोधें'

म्हणोनि संकल्प आणि विकल्प। अवघे झाले भगवद्रूप'

श्रीहरीने मनांतच ठाण मांडले म्हणजे संकल्प आणि विकल्पात्मक मनच भगवद्रूप होते. मनाला त्याचाच छन्द लागतो. मग कानाने भगवत्कथाच श्रवण कराव्या, डोळ्यानी त्याचेच रूप पहावे, वाचेने त्याचेच गुणगान करावे, असे सर्वेद्रियांनी भजन सुरू होते.

वरील ओवीत भगवत्कथा श्रवणाविषयी सांगितले आहे. भगवत्कथा म्हणजे भगवंताच्या अवताराच्या कथा असाच अर्थ केला जातो. दशावतारांची वर्णने

सर्वच साधुसंतांनी मोठया प्रेमाने वर्णिली आहेत. परंतु त्यांत राम आणि कृष्ण यांची चरिबे परम पावन आहेत. आणि त्यांतहि पूर्णावतार भगवान श्रीकृष्णाचे चरित्र परम मंगल निर्धार आहे. रामचरित्र हे एक आदर्श जीवन चरित्र म्हणून जगांत मान्यता पावलेलें आहे. त्यावर अनेक साधुसंतांनीं आणि कविश्रेष्ठांनी आपली प्रतिभा पणाला लावली आहे. नाथानी भावार्थ रामायण ग्रंथ लिहून मराठीतून श्रवणसुखाचा ठेवाच निर्माण केला आहे. आदिनाथ शंकरासारखे रामभक्त वैष्णवशिरोमणि ठरले आहेत. रामकथा या भगवद्भक्तीचा जिव्हाळा उत्पन्न करणाऱ्या आणि वर्धमान करणाऱ्या आहेत. आणि कृष्णकथांचे काय सांगावे ? भक्तांना श्रीकृष्ण म्हणजे जणू साक्षात प्रेमाची मूर्तीच वाटते. कृष्णलीला आबालवृद्ध सर्वांच्या हृदयाचा ठाव घेणाऱ्या आहेत. श्रीकृष्ण म्हणजे भक्तांच्या हृदयसिंहासनाचा-भावराज्याचा सम्राट आहे.

शुकाचार्यांसारखे परम विरक्त महात्मे कृष्णकथा गायनांत परम आसक्त झाले आहेत.

'निवृत्त तर्षै उपगीय माणः'

विषयांतून निवृत्त झालेले महात्मे भगवंताच्या रासक्रीडेचें वर्णनहि आपल्याशींच गुणगुणत समाधान पावतात. व्यासांनीं लिहिलेल्या भागवत ग्रंथाने शुकाचार्य मुनीना खेचून आणलें.

प्रत्येकानें कान भरून रामकृष्णांच्या कथा ऐकाव्या, गाव्या आणि भक्ति प्रेमाचें आकंठ पान करावें असेंच अनेक साधुसंतांना वाटत आले आहे. सर्व प्रकारचीं साधनें, ज्ञान, ध्यान. यांचे सार्थक तेव्हांच समजण्यांत येतें कीं रामकृष्णांच्या ठिकाणीं निःसीम प्रीति उत्पन्न व्हावी.

'राम कृष्ण हरि'

या वारकऱ्यांच्या महामत्रांत सर्व भक्तिशास्त्र सामावलें आहे. ही भक्ति भगवंताविषयीं असली तरी तिची प्राप्तिमात्र सत्संगतीनेंच होणारी असल्यामुळें यापुढील ओवीत भगवंताचा महत्वाचा निरोपच जणू ज्ञानोबांनी ग्रथित केला आहे.

**'आत्मज्ञानें चोखडी। संत जे माझीं रूपडी।**
**तेथ दृष्टि पडो आवडी। कामिनी जैसी॥**

या अत्यंत महत्वपूर्ण ओंवीचा आशय आपण पुढील लेखांत पाहूं.

(अपूर्ण)

# श्रीनामदेव महाराज केळकर
## एका भक्ताचे अनुभव

(श्री. नथुराम सुदाम मोरे)

श्रीरामकृष्ण महाराज जांभेकर यांचे पट्टशिष्य व ज्यांची त्यांच्यावर संपूर्ण कृपा होती असे श्रीनामदेव महाराज केळकर हे मुंबईंत समाधिस्थ होऊन सुमारें वीस वर्षें झालीं. प्रतिवर्षी त्यांची पुण्यतिथी डिसेंबर महिन्यांत (यंदा ता. ३ डिसेंबर १९७०) त्यांच्या भक्तांकडून चांदणेवाडीतील ( दादर ) त्यांच्या समाधिस्थानीं साजरी केली जाते. त्या निमित्त त्यांच्या एका भक्तानें सांगितलेले अनुभव.

—संपादक

मी मुंबईंतील 'मुंबई वैभव प्रेस' मध्यें गेलीं सुमारें पंचवीस वर्षें नोकरीस आहें. माझा व श्रीनामदेव महाराज केळकर यांचा संबंध कसा आला तें सांगतों. माझ्या शेजारी श्री. गंगाराम वालावलकर हे रहात असत. ते पूर्वी टोप्यांचा धंदा करीत आणि श्रीकेळकर महाराज हेही टोप्यांचा धंदा करणारे त्यामुळें त्या दोघांची ओळख व मैत्रीही होती. ते दोघेही श्रीरामकृष्ण महाराज जांभेकर यांच्याकडे जायचे. त्यांची सेवा करायचे. श्रीजांभेकर महाराजानीं समाधी घेतल्यानंतर श्रीकेळकर महाराज यानीं श्री. गंगाराम यांस श्रीजांभेकर महाराजांची एक तसबीर दिली. तिची ते भक्तिभावानें पूजा अर्चा करायचे. त्या भक्तिभावांत ते दंग असायचे. मी शेजारी या नात्यानें त्यांच्या पूजाअर्चेच्या वेळीं त्यांना गंध उगाळून देणें, फुलपत्री आणून देणें वगैरे बाबतींत त्यांना सहाय्य करीत असें. त्यांत मला आनंद व समाधान वाटत असे. गंगाराममुळें माझा व श्रीकेळकर महाराजांचा परिचय झाला. त्यांच्या ठायीं माझी भक्ति जडली होती. ते कधींमधीं माझ्या घरीं यायचे व माझी चौकशी करायचे. ते जेवणाच्या वेळीं आले तर मी त्यांना भोजन करण्याचा आग्रह करीं. माझ्या आग्रहाचा त्यानीं कधीं अनादर केला नाही. दोन घास कां घेईनात; परंतु ते प्रेमानें घ्यायचे. मला त्यामुळें समाधान वाटायचें.

माझी परिस्थिति चांगली नव्हती. जेमतेमच होती. महाराजांना त्याची जाणीव होती. ते म्हणायचे तूं कांहीं काळजी करूं नकोस. तुझं ठीक होईल.

माझा मोठा मुलगा शाळेंत जायचा, परंतु परीक्षेंत नापास व्हायचा. श्रीकेळकर महाराजांस हें समजलें, तेव्हां त्यांनीं त्याला आपल्या जवळचा एक छोटा नगारा दिला व त्याला सांगितलें कीं, रोज शाळेंत जातांना या नगाऱ्यावर एक काठी मारायची आणि मग शाळेंत जायचें; तसेंच दर गुरुवारीं समाधिस्थानीं येऊन प्रार्थना करायची. त्याप्रमाणें तो करू लागला. तो सहावीपर्यंत पास होत गेला. एकदां तो महाराजांसमोर गेला असतां त्यानीं त्याचे केस धरून त्याला खालीं वाकविलें आणि म्हणाले, "तूं काय योजलें आहेस सांग?"

त्यानंतर कांहीं दिवसांनीं महाराज इहलोक सोडून गेले आणि त्यानंतर सुमारें पंधरा दिवसानीं माझा मुलगा घर सोडून गेला. त्याला आतां बारा वर्षें होत आलीं. अद्याप त्याचा पत्ता नाहीं !

माझ्या मुलीचीं मुलें जगत नव्हतीं. ही गोष्ट मी श्रीकेळकर महाराज यांच्या कानावर एके दिवशीं घातली. माझी मुलगी त्यांची भक्ति करायची.

एके दिवशीं श्रीकेळकर महाराज एक लुगडें नेसून माझ्या मुलीच्या घरीं अचानक आले. आपल्या बरोबर त्यानीं एक चौघडेवाला आणला होता. त्याला तिच्या दारीं चौघडा वाजवायला सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें वाजविला. त्यानंतर महाराजानीं त्या चौघडेवाल्यास दहा रुपये द्यायला सांगितले व ते तिनें दिले.

महाराज लुगडें नेसून आले होते तें लुगडें सोडून माझ्या मुलीला दिलें व तिला नेसायला सांगितलें. तिनें सांगितल्याप्रमाणें केलें. एवढें झाल्यानंतर महाराज म्हणाले "माझें काम झालें. आतां मी जातों!"

त्यानंतर सुमारें चार महिन्यांनीं माझी मुलगी गरोदर राहिली व तिला मुलगा झाला. आज तो २२।२३ वर्षांचा असून कर्तबगार झाला आहे.

माझ्या जांवयास अल्सरची बाधा झाली होती. त्याला हॉस्पिटलमध्यें ठेवलें होतें. महाराज त्याला पहाण्यासाठीं हॉस्पिटलांत गेले. त्याला धीर देऊन ते म्हणालें, "तूं बरा होशील. कांही चिंता करू नकोस. तिखट व गरम कांहीं खाऊ नकोस."
नंतर थोड्याच दिवसांनीं महाराजांच्या कृपेनें माझे जांवई बरे झाले.

# मनांत आलं कीं

( मार्च ७० च्या अंकावरून चालू )

लेखक—द. शं. टिपणीस

## ( ८४ )— झाडाचीं मुळें

केवढा मोठा वृक्ष तो. आणि डौलदार किती ! हिरव्यागार पानांनीं भरलेला. फुला फळांनीं बहरलेला. मोहक दिसे. जो पाही तो म्हणे, ' वा ! किती सुंदर डौलदार वृक्ष आहे ! असा इतरत्र क्वचितच सापडेल. ' भरपूर पैसे देईल. मालकाला चांगलाच फायदा होईल. शेजारीच एक शेवग्याचे झाड होते. हाडकुळे होते बिचारे ! मालकाला त्या पासून फारसा पैसा मिळत नसे. त्यामुळें मालकाचें सगळे लक्ष त्या मोठ्या वृक्षाकडे. याचा त्या वृक्षाला अभिमान वाटे. अभिमानानें डोलायचा आणि शेवग्याला हंसायचा ! बिचारा शेवगा बाजूला अंग चोरून उभा असायचा. एक दिवस वृक्ष शेवग्याला म्हणाला, " बाबा, तूं असा कसा वाळकुटा. तुझी संतती ही कशी वाळकुटी, हडकुळी. माझी बघ कशी भरदार वाटोळी गुबगुबीत गुलाबी आणि सर्वांना हवीशी वाटणारी. " शेवग्याला वाईट वाटलें. तो म्हणाला, " तूं म्हणतोस तें खरं. देवाचे देणें तें पण माझी संतती कशीही असली व मी कसाही असलों तरी लोक अडीअडचणीला माझ्याकडे धाव घेतात. संतती आहे तोंपर्यंत तुला मान. मला नसली तरी लोक मदतीसाठीं माझ्याकडे धाव घेतात. माझ्या शरीराचा प्रत्येक भाग लोकांच्या कारणी लागतो. संततीच्या जीवावर तूं मोठेपणा मिळवतोस. तूं काय किंवा मी काय जें उभे आहोंत ते अदृश्यामुळे आहेतना ! त्यांच्यामुळें. तुला वाटतें तुझा पराक्रम. म्हणून अभिमान करतोस. गर्व करतोस. " वृक्ष म्हणाला, " अं एकेकाळीं पोसलं मला मुळांनीं आत काय त्यांचें ? " शेवगा म्हणाला, " आज जें वैभव तुला प्राप्त झालें आहे ते मुळांमुळेंच. तीं नसली तर तुझं हें वैभव टिकणार नाहीं. उगाच अभिमान धरून मूळचे उपकारकर्ते विसरूं नकोस."

वृक्ष म्हणाला, " वैभव मी मिळविलें. तो माझा पराक्रम आहे. ती माझी ताकद आहे. म्हणून मला मान मिळतो. मुळांमुळें नव्हे. ती नसली तरी मी माझ्या पायावर उभा राहू शकतो व वैभव मिरवूं शकतो. शेवगा म्हणाला, शक्य नाहीं. मुळांशिवाय तूं कसा उभा राहणार? वृक्ष म्हणाला, त्यांच्या शिवाय मी उभा राहू शकतो हें दाखवतो म्हणजे झालं ना ! त्या वृक्षानें उंदरा घुसीशी मैत्री केली. त्यांनीं मुळें खाऊन मोडून तोडून टाकली. मुळें गेलीं पोषण गेलं. तो वृक्ष सुकत सुकत साफ वाळून गेला. आतां त्याला कोणी विचारीना, मालक बघेना, एके दिवशीं मालकानें त्याला लाकूडतोड्याला विकून टाकले. त्यानें त्याचे तुकडे केले. शेवगा मात्र अजून उभा आहे. माणसांत वृक्ष व शेवगे असतात, वृक्ष असतात ते आपल्या मुळाला विसरतात शेवगा मुळाची जाणीव ठेवतो व जें देवानें दिलं तें लोककल्याणासाठीं लावतो. शेवग्यानें वृक्षाचे तुकडे पाहिले. दोन, अश्रु टपकले व शेवगा उवाच, " बरें केलें देवा. तूं मला फुगणारा वृक्ष न करतां वाळकुटा पण कल्याणकारी शेवगा केलास."

## (८५)— वकील व माया

माया म्हणजे काय हें सांगूनही समजत नाहीं. वास्तविक त्यांत तसं कांहीं कठीण आहे असें नाहीं. आपल्या नित्यपरिचयाची, समाजांत वावरणारी ती आहे. शहरांत तर तिचा सुळसुळाट असतो. सर्व समाजांत, सर्वकालीं, सर्वदेशी वावरणारी ही मायेची प्रतिकृति दृश्य असून याच देहीं, याच डोळां, आपण समाजांत ती पहात असतो. तिच्या साह्याविना पुष्कळ लोकांचे व्यवहार अडून राहतात. तिचें साहाय्य मिळविण्यासाठीं लोकांची धावाधाव चालू असते. माया ही शक्ति आहे व शक्ति ही अदृश्य असते. यामुळें आपल्या हर एक व्यवहारांत ती वावरत असूनही आपणांस तिच्या अस्तित्वाची दाद नसते. अदृश्य शक्ति कार्यान्वित होण्यासाठीं कुठल्या तरी दृश्य साधनाची आवश्यकता असते. आपण सर्व मायेची साधने आहोंत आपण खूप समजतो कीं मी हें करतों अन् तें करतों. पण करावयास लावणारी ती माया आहे. मांजर उंदरास जसें खेळवतें तसें ती आपणास खेळवीत असते. ती पदोपदीं आपल्याला भुलवीत असते, फसवीत असते. जे आहे ते ती लपविते व जे नाहीं ते आहे असें भासविते. खोट्याला खऱ्याचे व खऱ्याला खोट्याचे रूप देते. जे दिसते तेच

रूप खरे असे समजून आपण चालतो व फसतो. खरे रूप असलेला खोटा व खोटें रूप असलेला खरा या दोन खांबाना बांधलेल्या अहंकाराच्या सूक्ष्म ताठ तारेवर आपण कसरत करीत असतो. ही कसरत म्हणजेच आपले जीवन. तोल सांभाळता यावा म्हणून बुद्धीची छभी तिने आपल्या हाती दिली आहे. ट्रॅफिक सिग्न-लचे दिवे जसें एकदा हिरवे एकदा तांबडे होतात व इकडचा लोंढा तिकडे व तिकडचा लोंढा इकडे धावत असतो तसे हे दोन्ही खांब खरे खोटे, खोटे खरे असे बदलत असतात व आपण त्या प्रमाणे एकदा या टोकाकडे तर एकदा त्या टोकाकडे बुद्धीच्या छभीने समतोल राखण्याचा प्रयत्न करीत फिरत असतो. अगदी या मायेच्या बरहुकूम कामे करणाऱ्या व्यक्ती समाजात आहेत. त्या खऱ्याचे खोटे व खोट्याचे खरे करून आपले काम साधून घेतात अशी व्यक्ति म्हणजे वकील तिचे कार्य कसें चालते ते माहीत करून घेणे म्हणजे माया कशी कार्य करते याचे ज्ञान होणे.

## (८६)— क्रिकेटचा खेळ

Crieket is a game of chance असें म्हणतात.तसा तो आहे ही,पण या खेळांत कशाचा कांहीच भरंवसा देतां येत नाही. या खेळात कोणता संघ जिंकेल हे सुरवातीला सागता येत नाही सांगितल तर तस होईलच अस नाही निराळेच काही तरी होऊन बसत. क्रिकेटच्या खेळात भरंवशाचे कांही असेल तर तें भरवशाच्या म्हशीला टोणगा हे असते. बहुतेक वेळा हे असेच होते. पट्टीचा फलदाज शून्य घेऊन आल्या पावती जातो तर दुसऱ्या पट्टीचे एकादवेळ ५०-६० खिशात घालून जातात खात्रीचा गोलंदाज पण त्याला चांगला चोपून काढतात. तर दुय्यम शत्रूंची दाणादाण करून त्याला वळायला लावतात. साधा झेल सुटतो व मरू पहाणाऱ्या फलंदांजाला अमृत मिळून तो जीवंत होतो व मग जीवंतपणे खेळून हैराण करतो. हातातील विजयश्री शेवटच्या पाच मिनिटांत निसटून जाते तर ध्यानी मनी नसलेली विजयश्री शेवटच्या क्षणी माळ घालून जाते. चांगला सेट झालेला धावा जमवण्याच्या रंगांत आलेला फलंदाज, केळयाच्या सालावरून फसकन पडावे तसा त्रिफळा पडल्यामुळें पडलेल्या चेहऱ्यानें चालू लागतो. फलंदाज काय, गोलंदाज काय, क्षेत्ररक्षक काय कोणाचा कांहींच भरंवसा देतां येत नाहीं. संघांत समा-वेश नसलेले अनाहूत पाव्हणे कित्येकवेळां मैदानांत उतरून रंगाचा बेरंग करतात किंवा घसरणाऱ्या संघाला सावरतात. उदाहरणार्थ पाऊस म्हणून म्हणतात Cricket is a

game of chance. Chance चा अर्थ क्रिकेटच्या क्षेत्रांत मोठा विलक्षण आहे. एखाद्या फलंदाजानें शतक काढले कीं तो कुशल, पहिल्या पट्टीचा फलंदाज. कारण तो त्याचा पराक्रम. पण जेव्हां त्याचा त्रिफळा शून्यांत उडतो तेव्हां तो Chance नें मेला. (जुनाशब्द नवा बाद झाला) असें म्हणतात. मॅच जिंकली तर संघच तसा बलवान आणि हरली तर चालायचंच Cricket is a game of Chance थोडक्यांत यश आपले व पराभव Chance चा. कोणत्याही खेळांत हें असेंच. जीवन हा एक खेळ आहे म्हणजेच Life is a game of Chance.

( ८७ ) — **जीवन खेळ**

क्रिकेटचा खेळ व जीवन यांत बरेंच साम्य दिसतें. Chance मानण्याची वृत्ति क्रिकेटप्रमाणें जीवनांतही दिसून येते. जीवनांत Chances येतात, देतात, घेतात, नि सोडतातही भरंबशाच्या दृष्टीनें दोन्ही सारखेच. फलंदाजाप्रमाणें कोण केव्हां जीवनांतून बाद होईल याचा भरंवसा देतां येत नाहीं. श्रीशंकराचार्य, ज्ञानेश्वर, गडकरी आदींसारखे जीवन साहित्यांतील खंदे फलंदाज सेट होतात न होतात तोंच बाद झाले. मराठा संघांतील आपल्या गोलंदाजीनें प्रतिपक्षाचा धुव्वा उडवून देण्यांत नाणावलेल्या गोलंदाजांची प्रतिपक्षानं त्रेधा तिरपिट उडवून दिली. अगदी ‘ रबर ’ मिळविण्याच्या खात्रीनें पानपतवर गेलेला मराठा संघाला चांगलें फलंदाज बळी देऊन पदरीं अपयश घेऊन परतावें लागलें. जीवनांत Chances येतात. ते अचूक टिपण्याचें कौशल्य असणें जरूर आहे. क्रिकेटमध्यें जसें तसेंच जीवनांत झेलण्यांत वाकबगार असणारा संघ यशाचा मानकरी असतो. पण बहुतेकांचें क्षेत्ररक्षण कच्चे असते. निष्काळजीपणे केलेलें असतें. क्रिकेटमध्यें फलंदाजी सर्वांना हवेशी वाटते, गोलंदाजी फारच थोड्यांना आवडते व क्षेत्ररक्षणाचा सर्वांना कंटाळा असतो. वास्तविक क्षेत्ररक्षण ही महत्वाची गोष्ट आहे. जशी क्रिकेट मध्यें तशीच जीवनांत. जीवन क्षेत्राचें रक्षण करणें जरूर असतें. बेसावधपणामुळें शत्रु बळावतो. आम्ही भारतीय जीवन क्षेत्ररक्षणांत एकंदर कमीच पडतो हा आपला गुण क्रिकेट-मध्यें ही दिसतो. यामुळे आमची फलंदाजी चांगली असली तरी पराभव आमच्या वाट्यास येत असतात. क्रिकेट सारखाच जीवन हा एक खेळ आहे. तो खेळावा पण जीवनाशी खेळू नये. व्यवहारांत गोलंदाजी आवश्यक आहे पण आमची ती ऐनवेळी मरगळते. चांगल्या गोलंदाजीने ( डाव पेच ) शत्रूला ( मानसिक ) नामोहरम करणे

उत्तम फलंदाजीने (जीवन कर्तव्यें करून) जीवनाच्या धांवा उंची वाढवीत नेणे, उत्तम क्षेत्ररक्षणाने शत्रूला वरचढ होऊ न देणे व जीवन खेळतांना इतराना Chances न देणें (आपल्यावर मात करण्याचें) हें क्रिकेटच्या खेळा-प्रमाणे जीवनातही आवश्यक आहे. असे न केलं तर जीवनाचे 'पानवत' होण्याचा धोका असतो.

## (८८)— दोनच का?

निसर्गानें माणसांनाच नव्हे तर बहुतेक सर्व प्राण्याना दोन कान दिले आहेत. दोनच कां? एका कानानें नसते का काम झाले? विज्ञान काही उत्तर देईल. पण माझ्या बालबुद्धीला वाटते की दोन्ही दिशांना ऐकू यावे म्हणून दोन कान दिले असावेत. मग बाकीच्या दिशांचे काय? चौफेर ऐकूं येण्यासाठी चार कान पाहिजे होते. चारच कां? आणखी दिशा आहेत कीं? व्यवहारांत आपण अष्ट दिशा वापरतो. म्हणून मानव हा अष्ट कानांचा पाहिजे होता. छे! हें कांही तरीच बोलणं. असं कांही असेल असं वाटत नाही. कदाचित असं असेंल. जगाचा पसारा चालविण्यासाठी द्वित्वाची जरूरी आहे. म्हणून असतील दोन कान. एकानें कार्य करण्यापेक्षां जोडीनें करणें अधिक चांगले म्हणूनही असतील कदाचित असं कशावरून नसेल? वेळप्रसंगी उपयोगी पडावा म्हणून मोटारला एक स्पेअर टायर असतो. तसे एकाने भागलें नाही, न जाणो एकांत बिघाडा झाला तर वेळप्रसंगी दुसरा उपयोगी पडावा. म्हणून दोनांत एक स्पेअर असेल. असं कशावरून नसेल की दोन्ही बाजूस एक एक असल्यामुळें मुखकमलास शोभा येते? सुंदरपणा निर्माण करण्याची निसर्गाला भारी हौस आहे. मुखकमलाला एकच कान असता व मग त्या कानांत एकच दागिना घातल्यामुळें कमल कसें काय दिसले असते,? असलं कांही विचित्र चित्र नव्हते निसर्गाला निर्माण करावयाचे. म्हणून दोन असतील. पण उगाच कल्पना कशाला करीत बसा? कानांचा करण्यांत येणाऱ्या उपयोगावरून कारण शोधून पाहूं की. एक कान उपटल्यावर जेवढा शहाणपणा येईल त्याच्या दुप्पट दोन कान उपटल्यास येईल असा कांही निस-र्गाचा हिशोब असेल. कोणत्याही बाजूनें गुरूला सहज कान फुकतां यावे म्हणूनही दोन कान असतील. या कानाचा खडा त्या कानाला न-लागतां काम करतां यावे म्हणून कदाचित दोन असतील. नक्की काय ते निसर्ग जाणे लोक कानांचा जो उपयोग करतात तो पाहिल्यावर अस वाटत की एका कानाने ऐकले व दुसऱ्या कानाने सोडून दिले हे

कार्य चांगले करतां यावे म्हणून दोन कान दिले असावेत. नळी फुंकली सोनारें यातील नळीचे सख्खेबंधू म्हणजे हे दोन कान असावेत. हात्तीच्या, उगाच विचार कशाला किती सोपे उत्तर आहे आता आल लक्षात कान उलटा करा म्हणजे सहज उत्तर मिळेल निसर्ग माणसाला दोन दोनदा बजावून सागतो कीं नका नका हे सर्वं खर मानू नका व त्याच्या नादी लागू नका.

# 'ब्रह्मरस घेई काढा!'

(लेखक : शाहीर खाडिलकर एम्. ए. बी. टी.)

**या लेखांत शाहीर खाडिलकर यानीं सुखदुःखाची केलेली मीमांसा कोणाही विचारी माणसाला पटेल, एवढेच नव्हे तर त्याच्या मनावर परिणाम करील अशा सुबोधरीतीनें केलेली आहे. शाश्वत सुख हवें असल्यास मानवानें कशाची कास धरणें जरूर आहे, काय घेतल्यानें ही सर्वपीडा दूर होईल. त्याचें जें समर्पक व स्वानुभवी उत्तर संत तुकोबांनीं दिलें आहे. त्याच्या आधारें हा महत्त्वाचा विषय फार सुंदर रीतीनें रंगविला आहे. शाहीर खाडिलकर यांचा हा लेख प्रत्येक मुमुक्षूनें आवश्य वाचून त्याचें मननपूर्वक आचरण करण्यासारखा आहे**

— संपादक

कधीं कधीं मी संत तुकारामांचे अभंग वाचत बसतों; त्यामुळें मन शांत आणि चिंतनशील होतें, असा माझा अनुभव आहे. एके दिवशीं रात्रीं नऊच्या सुमारास अशीच मी गाथा हातांत घेतली आणि एकदम जें येईल तें पान उघडलें. त्या

पानावर सुरवातीलाच जो अभंग वाचला त्यानें माझें मन एकदम चिंतनशील बनविलें. त्या अभंगाची सुरवात या लेखाच्या अग्रभागीं दिलेली आहे. तो अभंग असाः–

### अभंग

**ब्रह्मरस घेईं काढा। जेणें पीडा वारेल॥ १॥**
**पथ्य नाम विठोबाचें। आणीक वाचे न सेवीं॥ २॥**
**भवरोगा ऐसें जाय। आणिकें काय क्षुल्लकें॥ ३॥**
**तुका म्हणे नव्हे बाधा। आणीके कदा भूतांची॥ ४॥**

हा अभंग कोणाला उद्देशून सांगितला गेला आहे? असा हा आजारी कोण असावा? ब्रह्मरस काढा कोणी तयार केला आहे? अशी चिकित्सा करून अमोघ औषधयोजना करणारे हे वैद्यराज कोण असावेत बरें? असे विचार मनांत घोळूं लागले. थोड्या चिंतनानंतर प्रकाश पडूं लागला आणि हें कोडें उलगडूं लागलें. हा रोगी म्हणजे शारीरिक व मानसिक आधिव्याधीनें त्रस्त झालेला माणूस होय. नुसत्या शारीरिक व्याधीनें पीडलेला रोगी नव्हे. कारण अशा रोग्यासाठीं अनेक वैद्य व डॉक्टर जगांत उपलब्ध आहेत. ते नानाप्रकारची औषधें व इन्जेक्शनें देतात आणि रोग्याला आराम देण्याचा खूप प्रयत्न करीत असतात. प्रसंगविशेषीं जरूर पडल्यास शस्त्रक्रियाही केली जाते. आणि बरें वाटतेंही; पण त्यापैकीं कोणालाही वैद्यानीं ब्रह्मरसाचा काढा दिलेला ऐकिवांत नाहीं. मग असा रोगी तरी कोण असावा? आणि हा काढा देणारे धन्वंतरी तरी कोणआहेत बरें? आणि या काढ्यानें नष्ट होणारी पीडा तरी कोणती? त्या सर्वांचें उत्तर संत तुकारामांनीं आपल्या अभंगांत दिलेला आहे. विठ्ठलाचे नामस्मरण हें पथ्य; या काढ्यामुळें भवरोग समूळ नष्ट होतो, मग बाकीच्या रोगांची गोष्ट कशाला?

जगांतील प्रत्येक मानव ही पीडा भोगत असतो. आणि ही पीडा म्हणजेच जगांतील अनंत प्रकारची अनंत दुःखें! प्रत्येकजण सुख मिळविण्याची पराकाष्ठा करीत आहे. पण त्या सुखाचा थांगपत्ताही लागत नाहीं. दुःख मात्र दत्त म्हणून सारखें उभें असतें! असें कां होतें?

### पद (स्वकृत.)

**पाहिजे सुख सकला परि तें मिळत न कोणाला॥**
**सुख सुख म्हणतां दुःखचि आलें अनुभव हा आला।**
**अनुभव आला परी विसरला, मोडुनियां गेला!॥ १॥**

तेव्हां कोठें तरी आपलें चुकत आहे हें खास! ज्याला आपण सुख किंवा दुःख असें म्हणतों तें सुख किंवा तें दुःख एखादी वस्तु नसून ती एक अवस्था आहे. सुखदुःख या अवस्था अनुभवितां येतात पण त्या डोळ्यांना दिसत नाहींत. सुख संपतें कोठें आणि दुःख कोठें सुरू होतें हें मुळीं कळतच नाहीं सुख व दुःख एकमेकांत इतकें मिसळलेलें असतें कीं त्यांना वेगवेगळें काढणें अशक्यच असतें. ज्याला आपण व्यवहारांत सुख समजतों तें सुख **नसून** दुःखच, सुखाचा मुखवटा चढवून येत असतें. ऑपरेशन करण्याच्या आधीं सर्जन शरीर बधिर करणारें इंजेक्शन देतो अन् मग ऑपरेशन करतो. वेदना होतच असतात पण त्या वेदना इंजेक्शनमुळें जाणवत नाहींत. म्हणजेच वेदना सुसह्य होतात. ऑपरेशन चाललें असतांना रोगी ती जागा पहात असतो, क्वचित् हंसत ही असतो असें आपण पाहतो. पण बधिरपणाचा जोर जसजसा कमी होत जातो तसतशा वेदना जाणवूं लागतात. सुसह्य दुःख म्हणजेच व्यावहारिक सुख होय. तें सुख नसून नुसता आभास आहे. ह्या आभासात्मक सुखाची पूर्ण जाणीव करून घेऊन मानवी जीवन सुखसमृद्ध आणि निरोगी करण्यासाठीच **ब्रह्मरसाचा काढा** अत्यावश्यक आहे.

ह्या सुखदुःखावस्था आपल्या ठिकाणीं कशा निर्माण होतात म्हणजेच त्यांची माध्यमें कोणतीं ? हीं माध्यमें म्हणजेच बाह्य जग होय. तसेंच आपण कल्पनेनें तयार केलेले मनोमय जगही आपणावर सुखदुःखें आणून टाकत असते.

बाह्य जगाचें आपणांस पंच ज्ञानेंद्रियांमार्फत ज्ञान होत असतें. डोळे, कान, जीभ, नाक आणि त्वचा, या इंद्रियांचा संबंध बाह्य जगाशीं आला कीं सुखदुःखांची हालचाल आपल्या ठिकाणीं होऊं लागते. तसेंच काल्पनिक जगाचेही आपणावर परिणाम होत असतात. भयंकर स्वप्न पडल्यास आपण घाबरून जातों. मनोमय काल्पनिक सृष्टिसुद्धा असेंच परिणाम घडवीत असते. पण या सर्वांत बाह्य सृष्टीचेच परिणाम इंद्रियद्वारा फार मोठ्या प्रमाणांत होत असतात. बाह्यसृष्टि पंचमहाभूतांच्या पंचीकरणानें बनली आहे. पृथ्वी, आप, तेज, वायु, आणि आकाश, हीं पांच महातत्त्वें. त्या प्रत्येकाचे गुण असेः— पृथ्वीचा गुण; गंध; आप म्हणजे पाणी; त्याचा गुण रस; तेजाचा गुण रूप; वायूचा गुण स्पर्श आणि आकाशाचा गुण शब्द हा होय. पंचज्ञानेंद्रियांचा ह्या पांच प्रकारच्या गुणांशी संस्पर्श म्हणजे संबंध आला कीं लगेच त्याचे परिणाम शरीर व मन यांच्यावर होऊं लागतात. जसे पॉझिटिव् व निगेटिव् अशा दोन तारांमधून वीजप्रवाह एकत्रित

झाला कीं बीज दिसूं लागते त्याप्रमाणें हें घडत असतें. हा बाह्य जगाचा अनुभव गोड, आराम देणारा, आणि आनंददायक जोपर्यंत असतो, तोपर्यंत आपणांस सुखाचा अनुभव येत असतो; पण तोच अनुभव त्याविरुद्ध खळबळ माजवूं लागला की दुःख अनुभवास येऊं लागतें. बाह्यविषय माणसाला कायमचें सुख किंवा कायमचें दुःख देऊं शकत नाहीत. कारण कांही काळापर्यंत तरी तें दुःख सुखाचा मुखवटा चढवून काही वेळ सुख देत असतें. सुखदुःखाचे स्पष्टीकरण शास्त्रकारांनीं खालील प्रमाणें केलेले आहे. **अनुकूलवेदनीयं सुखम्। प्रतिकूलवेदनीयं दुःखम्।** एखाद्या पदार्थापासून जोपर्यंत आपणास अनुकूल वेदना उत्पन्न होत असतात तोपर्यंत येत असलेल्या अनुभवाला आपण सुख असें म्हणतो; पण जेव्हां वेदना प्रतिकूल होऊं लागतात तेव्हां तोच पदार्थ आपणांस नको नकोसा झाल्यामुळें दुःख देऊं लागतो. जगांतील नानाप्रकारचे विषय आपणाला आकर्षित करीत असतात. त्या त्या विषयांचा आणि त्या त्या इंद्रियांचा जेव्हां संबन्ध जडतो तेव्हां आपणाला त्या त्या विषयाचा बरा वाईट अनुभव येऊं लागतो. जोपर्यंत इंद्रियें आणि बाह्यविषय यांचा संस्पर्श होत नाही तोपर्यंत ते विषय मनुष्यावर परिणाम करू शकत नाहीत. अंध माणसाला डोळ्यानें दिसणारे पदार्थ असून नसून सारखेच आहेत. बाह्य पदार्थांशीं संयोग झाल्यावर जरी कांही काळ सुखसंवेदना होऊ लागली तरी ती कायमची राहात नाहीं. श्रीखंड हवेहवेसें वाटते तोपर्यंत सुखसंवेदना होत असतात. पण त्या श्रीखंडाचा अतिरेक झाला तर तेच दुःख देऊ लागते; त्याची शिसारी येते आणि तेंच डोळ्यासमोर नको असें होऊ लागते.

भगवान् सांगतातः—

### श्लोक

**ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते ।**
**आद्यन्तवन्तः कौंतेय न तेषु रमते बुधः ॥ अ. ५-२२**

**अर्थ**—बाह्यविषयांशीं इंद्रियांचा संबंध आल्यावर जे भोग मिळतात त्यांचें पर्यवसान दुःखांतच होत असतें. कारण त्यांना आदि व अंत आहेत, म्हणून जाणता माणूस त्यांच्या ठिकाणीं आसक्ति ठेवीत नाहीं.

ज्ञानेश्वर सांगतात:—

**(ओंवी)—नातरी मृगें तृषापीडितें। संभ्रमें विसरोनि जळातें।**
**मग तोयबुद्धि बरडीतें। टाकून येतो.** ॥ (अ. ५-२२-१११) ॥

पाण्यासारखे मृगजळ दिसतें म्हणून हरिण पाणी मिळेल म्हणून माळरानाकडे धांवत सुटतात. पण तेथें गेल्यावर भ्रमनिरास होतो. तसेंच बाह्यविषयांचें आहे. विमानांतून कांहीं काळ फिरणें बरें वाटेल; पण बाराही महिने जर विमानाचा प्रवास सुरू झाला तर तो आवडणार नाहीं.

कामेच्छा कांहीं काळपर्यंतच सुख देईल पण पुढें दुःखच ! दुःख नसलें तरी उदासीनता तरी येईलच.

मनुष्याच्या ठिकाणीं काम, क्रोध, मोह, मद, लोभ व मत्सर असे सहा विकार कायमच असतात. त्यांतल्यात्यांत मद-मत्सरांच्या पासून उत्पन्न होणारा **अहंकार** मनुष्याला सतत दुःखच देत राहणार, यांत संशय नाहीं. हे सहा विकार बळावले तर मनुष्याला बेताल बनवितात. मनावर यांचा पगडा फार जबरदस्त असतो. पण मनुष्याला त्यांना अजिबात दूर करणें अशक्य आहे. कारण हे जन्माबरोबरच आपल्या बरोबर असतात. मग यांचा बंदोबस्त कसा करतां येईल ? त्याचा मार्ग संत सत्पुरुषानीं दाखविलेला आहे. कामादिकांचा योग्य उपयोग करून घेतल्यास हेच शत्रूऐवजीं जिवलग मित्र होतात. मुक्तेश्वर सांगतात :—

**ओवीः—काम असावा ईश्वरभजनीं। क्रोध असावा इंद्रियदमनीं।**
**महाप्रसादशेज भक्षणीं। लोभ अपार असावा ॥ १ ॥**

ईश्वरभजनांत काम गुंतवून ठेवावा; इंद्रियनिग्रह क्रोधपूर्वक करावा; लोभीपणा ईश्वरप्रसाद भक्षणीं असावा. मोहाचा उपयोग सज्जनसहवासांत करावा; दुष्टांच्या बाबतींत त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं मदाचा उपयोग करावा; आणि संसाराच्या बाबतीत मत्सराचा उपयोग करावा.

दुष्ट माणसांना कामक्रोधादिविकारांच्या माध्यमांतून बाह्यविषय आणि इंद्रियें यांच्या संयोगानें सुख मिळवावयाचें असतें. आणि त्यासाठी दुष्ट दुर्जन वाटेल तीं भयकर क्रूर कृत्यें करण्यास मागेपुढें पाहात नाहींत; पण त्यांना सुद्धां कायमचे सुख मिळवितां येत नाहीं, मिळवतां आले नाहीं हें आपण रावणादिकांच्या उदाहरणानें पाहतोंच.

कित्येक वेळां मनोमय सृष्टि सुद्धां अशीच बंधनकारक होत असते. एखादी गोष्ट आपण मनानंच कल्पून उत्पन्न करीत असतो आणि त्या वस्तूच्या चिंतनातच आपण मग्न होऊन जातो; पण त्यामुळेंही खरें सुख मिळतच नाहीं.

स्वप्नमयसृष्टिसुद्धां अशाच प्रकारचा चमत्कार करीत असते. स्वप्नेंही आपणांवर सुखदुःखादि संवेदना निर्माण करीत असतात.

सुखावस्थांचे भगवंतानीं तीन प्रकार सांगितलेले आहेत. ते असे :-

श्लोक अध्याय १८ )

**सुखं त्विदानीं त्रिविधं शृणु मे भरतर्षभ।**
**अभ्यासाद्रमते यत्र दुःखान्तं च निगच्छति॥ ३६॥**
**यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम्।**
**तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम्॥ ३७॥**
**विषयेंद्रिय संयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम्।**
**परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम्॥ ३८॥**
**यदग्रे चानुबन्धे च सुखं मोहनमात्मनः।**
**निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम्॥ ३९॥**

भावार्थ : जें सुख सुरवातीस विषासारखे पण शेवटीं अमृतासारखे होतें ते सात्त्विक सुख होय. हे सुख कायम स्वरूपात राहात असते, जें सुख प्रथम अमृतासारखे पण शेवटी विषमय होते. ते राजस सुख; आणि जें प्रारंभापासून अखेर पर्यंत मोहामुळें किंवा अज्ञानामुळें सुख असे वाटत असते ते तामस सुख होय.

या तीन प्रकारांपैकीं बहुतेक माणसें राजस सुखानुभवी असतात.

ज्या सुखासाठीं मानवानें प्रयत्न करावा त्या सुखाचे वर्णन भगवंतानीं सहाव्या अध्यायांत केले आहे ते आता पाहूं :-

श्लोक

**सुखमात्यन्तिकं यत्तद् दुबुद्धिग्राह्यमतींद्रियम्।**
**वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः॥ २१॥**
**यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः।**
**यस्मिन् स्थितो न दुःखेन गुरुणा न विचाल्यते॥ २२॥**

भावार्थः जें सुख इंद्रियांच्या टप्प्याच्या पलीकडचें आहे आणि जें स्थितप्रज्ञेमुळें प्राप्त होतें तेंच उत्तमोत्तम सुख होय. हें सुख प्राप्त झाल्यावर मनुष्य कायमचा सुखी होतो. मोठमोठीं संकटें त्याला पळवीत नाहींत.

ज्ञानेश्वर सांगतात :–

### ओव्या

**जयापरतें आणिक नाहीं। जयातें इंद्रियें नेणती काहीं।**
**तें आपणचि आपुल्या ठायीं। होऊनि ठाके॥ (३६८)॥**
**मग मेरूपासूनि थोरें। देहदुःखचिनि डोंगरें।**
**दाटिजो पां परी भारें। चित्त न दाटे॥ ३६९॥**
**कां शस्त्रें वरी तोडिलिया। देह अग्नीमाजि पडलिया।**
**चित्त महासुखीं पहुडलिया। चेवोचि न ये॥ ३७०॥**

द्रव्य, दारा, सत्ता, ऐश्वर्य ही सुखाचीं साधनें आहेत. पण त्यांपासून मिळणारें सुख हें खरें सुख नव्हे असेंच संतमहंत आपणास सांगत आले आहेत. द्रव्यादिकांच्या प्राप्तीमुळें सुख मिळतें तसेच त्यांच्या त्यागामुळेंही मिळतें हें विसरून चालणार नाहीं. ज्यांच्या लाभामुळें आणि ज्यांच्या त्यागें सुख मिळतें ते पदार्थ कायम सुख देऊ शकत नाहीत. घर, दार, द्रव्य ह्या सर्वांचा त्याग चुटकीसरशी करून आत्मसमाधान करून घेणारे थोर लोक होऊन गेले आहेत आणि आज ही आहेत. ययातीनें हजार वर्षे पुरूचें तारुण्य घेऊन विषय सुख भोगलें पण शेवटी तो सुद्धां विटला. याविषयीचा महाभारतांतील श्लोक प्रसिद्ध आहे.

### श्लोक-

**न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति।**
**हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते॥**

कामोपभोगानें काम शांत नाहींच पण आहुति टाकलेल्या अग्नीप्रमाणें तो सारखा वाढतच असतो.

बाबू चित्तरंजन दासांचे मासिक उत्पन्न सुमारे पन्नास हजार रुपयांचें होते. पण तो पैसा सांठवून ठेवण्यांत त्यांना सुख दिसलें नाहीं. तो सर्व पैसा त्यानीं दानधर्मांत आणि सत्कार्यांत खर्च केला आणि शेवटी म. गांधींचें अनुयायित्व पत्करून ते देशासाठीं कफल्लक झाले !! आय्. सी. एस्. मुळे प्राप्त होणाऱ्या मोठ्या नोकरीवर लाथ मारून नेताजी सुभाष मातृभूमीच्या सेवेंत विरून गेले. अनेक वीर तुरुंगांत पिचत पडले, अनेक फांसावर लटकले आणि अनेक रणक्षेत्रावर बलिदान करीत आहेतच. हें सर्व करीतच असतांना कोणत्या तरी अज्ञात सुखाकडे त्यांची ओढ असते

मग शाश्वत सुख हवें असल्यास काय करणें आवश्यक आहे ! काय घेतल्यापासून ही सर्व पीडा नाहीशी होईल ? त्याचें उत्तरच संत तुकाराम यानीं **ब्रह्मरस घेई काढा या** अभंगांत दिले आहे.

आत्म्याच्या पृष्ठभागावर मनोविकारांच्या लाटा सतत उसळत असतात. ते मनोविकार शांत झाल्याशिवाय म्हणजे मन शांत झाल्याशिवाय आत्मदर्शन होणार नाहीं. आणि ते मन शांत व स्थिर करण्यासाठीं ब्रह्मरसाचा काढा उपयुक्त आहे. ब्रह्मरस म्हणजे ब्रह्मज्ञान. आत्मा आणि परमात्मा एकच आहेत ही भावना दृढमूळ झाली पाहिजे. यासाठीं अध्यात्म जाणले पाहिजे. **आत्मनि अधि अध्यात्मम्** अशी अध्यात्म शब्दाची फोड आहे. आत्म्याविषयीं जें ते अध्यात्म ! आत्मा हा परमात्म्याचाच अंश आहे. हें विश्व म्हणजे परमात्माच आहे. व्यक्तिव्यक्तींमध्यें तेंच तत्त्व वसत आहे. **तत्र को मोहः कः शोकः एकत्वमनुपश्यतः ।** हें ज्ञान झाल्यावर आपोआपच मन शांत होत जाईल. आणि सर्व विश्व आनंदमय होईल. या संबंधात **ईशावास्योपनिषदांतील पहिला** मंत्र आपणांस हेंच तत्त्व अधिकारवाणीने सांगत आहे. तो मंत्र असा—

**ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत् ।**
**तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृधः कस्यस्विद् धनम् ॥**

हे सर्व विश्व ईश्वरानें भरलेले आहे. म्हणून तू त्यागपूर्वक जगातील पदार्थांचा भोग घेत जा. परधनाचा लोभ धरू नको असा याचा अर्थ आहे.

या मंत्रात स्वार्थत्यागपूर्वक जीवनाचा उपदेश केलेला आहे. समाजांत आपण कसे राहावे हेंही सांगितलेलें आहे.

**दुसरा मंत्र असाः—**

**कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेत् शतं समाः ।**
**एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे ॥**

निष्काम कर्माचरण करीत शंभर वर्षे परमेश्वरी कार्य करीत रहा. हेंच कर्म योग्य आहे. यांतच तुझे जीवनसाफल्य आहे.

सर्वभूतीं एकच परमात्मा आहे, मी एक त्याचाच अंश आहे अशा समजुतीनें

जगणें हाच एक सुखाचा मार्ग आहे. या ज्ञानामुळें मनाची साम्यावस्था स्थिर राहते; पण तें ज्ञान प्राप्त होणें फार अवघड आहे. तें ज्ञान गुरुमुखांतून सुलभ रीतीनें व प्रभावी रीतीनें मिळूं शकते म्हणूनच संत सत्पुरुषांचा सहवास अध्यात्मासाठीं अत्यावश्यक आहे. **सद्गुरूसी शरण जाय। तेणें ब्रह्मप्राप्ति होय।** असें संत सांगत असतात. **'गुरुबिन कौन बतावे बाट'** असें कबीर सांगतात, आणि यासाठींच **सद्गुरुमहिमा-अगाध** आहे.

व्यक्ति व्यक्ति मिळून राष्ट्र होत असते. जशा व्यक्ति तसें राष्ट्र! व्यक्ति जर आत्मज्ञानी होईल तर राष्ट्रही ब्रह्मज्ञानी होईल. मग क्षुद्र कलह माजणारच नाहींत. आज अनेक पक्ष जनतेचें कल्याण करण्याच्या घोषणा करीत असतात. जनतेला सुख देण्याचे आश्वासन प्रत्येक पक्ष करीत आहे. जनतेचे कल्याण हाच जर सर्वांचा संकल्प असेल तर अंतःस्थ भांडाभांडी कां? हेंच कळत नाही. साम्यवाद, समाजवाद, लोकशाहीवाद, इत्यादि वादांनी फार तर आधि-भौतिक प्रश्न एखादे वेळेस सुटतील; पण त्यामुळें परस्पर प्रेमभाव वाढेल असें वाटत नाहीं. द्वेष, मत्सर इत्यादि भावना कमी होणार नाहीत. त्यांना गुण्यागोविंदानें राहण्यास शिकविण्यासाठीं सर्वांभूतीं एकच परमात्मा वास करीत आहे याची शिकवण दिली गेली पाहिजे. आणि ही शिकवण देऊन राष्ट्राला संपूर्ण निरोगी बनविले पाहिजे. आणि ते काम **ब्रह्मरसाचा काढा** देऊनच होईल. आज राष्ट्राला संतसत्पुरुषांची फार जरूरी आहे. तेच राष्ट्राची आध्यात्मिक उन्नति करून शाश्वत सुख जनतेला देतील. राजकारणी माणसें स्वतःची पोटेंच भरत राहतील.

## —प्रार्थना—

**भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः। भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः।**
**स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांसस्तनूभिः। व्यशेम देवहितं यदायुः॥**

**इति शम्**

# एका साईभक्त महिलेचा अनुभव

आमच्या घरांत मी माझे यजमान व दोन मुलें आहोंत. त्यामुळें मुलांना कुठें घेऊन जाण्याचे म्हटलें कीं अतिशय धांदळ होते. घर बंद करण्यापासून सर्व चाव्या संभाळीपर्यंत.

एकदां काय झाले, माझी मुलगी आजारी होती. तेव्हां डॉक्टरकडे २।४ दिवस इंजेक्शनसाठी जाणें भाग पडत होते. सकाळचा ह्यांना डबा व मुलाला शाळेंत पाठवून १० वाजता मी डॉक्टरकडे जात असे. एके दिवशीं मी अशीच दरवाजा बंद करून बाहेर पडलें तोच औषधाची बाटली विसरल्याचे लक्षांत आलें म्हणून मी दरवाजा उघडून चावी दरवाज्यालाच अडकवून बाटली घेऊन बाहेर पडलें. गडबडींत चावी दरवाज्यालाच राहिली व तशीच मी डॉक्टरकडे गेलें. दवाखान्यात गेल्यावर मी पाकिट उघडून बघते तो चावी नाहीं. कांही केल्या आठवेना कीं चावी कुठें पडली ? दरवाजाची एकच चावी व ती पण एका बारीक तारेला अडकविलेली. त्यामुळें कुठे पडली असेल तर ती मिळणें मुष्कील. एकदां वाटले कीं घरातच चावी राहीली असेल व मी दरवाजा ओढून घेतला असणार पण नाही...कारण बाहेर पडताना मी अगोदर चावी पाकीटात घालीत असे. लॅच की असल्यामुळें मला अगोदर चावी घेणे भाग पडत असे त्यामुळें माझी खात्री कीं घरांतच चावी पडली असणार.काय करावें-कांहींच आठवेना. जिवाची एवढी घालमेल झाली कीं विचारू नका.मनांत नाना तऱ्हेच्या वाईट शंका येऊ लागल्या. अशा वेळीं काय करणार? फक्त श्रीसाईबाबांचा धांवा ! माझा त्यांच्यावर पूर्ण विश्वास आहे. आजपर्यंत पुष्कळदां त्यांनीं मला अनेक अडचणींतून सोडविलें आहे. कुठले ही संकट आले कीं मी त्यांचे सारखे नामस्मरण करीत असते. घरांत सुद्धा रिकाम्या वेळीं माझ्या तोंडीं त्यांचेच नांव असते. त्यामुळें माझी त्यांच्यावर एवढी श्रद्धा आहे की कुठलीही वेळ मी निभावून नेऊ शकते.

टॅक्सीतून मी घरी आले व प्रथम दरवाजा बघितला. शेजाऱ्यांना विचारलें. त्यांच्याकडे जी मोलकरीण येते तिनें माझी चावी काढून ठेवली होती.

वास्तविक पहातां सकाळच्या सुमारास ती मोलकरीण तिकडे कधींच येत नाहीं, पण त्या दिवशीं तिला बाबांच्यामुळेंच काय बुद्धी झाली ! तिच्याकडून मी

सकाळीं बाजार आणून घेतला होता. तिच्या ओळखीच्या कोळिणीकडून ती मला पुष्कळदां बाजार आणून देत असे. गडबडीत त्या दिवशी कोळिणीनें त्या मोलकरणीला कमी पैसे दिले. मोलकरणीला वाटले की बाजार खूप महाग असल्यामुळें कमी पैसे परत मिळाले म्हणून तिनें बाजार व राहिलेले पैसे मला परत दिले.

परंतु परमेश्वराची कृपा असली कीं कशा गोष्टी घडतात तें बघा. त्या कोळि-णीच्या नंतर लक्षांत आलें कीं, आपण मोलकरणीला चुकून पैसे कमी दिले म्हणून ती लगेच तिच्या घरी गेली व उरलेले पैसे दिले, मोलकरणीला पण काय बुद्धी झाली कीं ते पैसे मला लगेच परत करण्याची. सबंध दिवसात तिने कधीही मला पैसे परत केले असते. पण श्रीबाबांच्या कृपेमुळेंच तिला तशी बुद्धी होऊन, ती लगेच माझ्या-कडे आली. बघते तो दाराला चावी अडकलेली. तिच्या लक्षांत आलें मी कुठें तरी बाहेर गेली असणार चावी विसरून !

श्री साईबाबांची कृपा असली की, कोणत्यावेळीं कुठल्या माणसाला कशी बुध्दी होईल, हें फक्त माणूस स्वानुभवावरूनच जाणू शकेल.

आज जर चावी नसती तर माझे काय हाल झाले असते ते फक्त मीच जाणे. दुसऱ्या कुणाला जर चावी मिळाली असती तर चोरी होण्याची भीति सदैव मनांत असती. कारण आमच्या बिल्डिंगमध्यें नाना तऱ्हेची पोरं येऊन बसतात पायरीवर.

बाबांच्यावरील विश्वासामुळेच मी संसारातल्या पुष्कळ अडचणींना तोंड देत आहे व माझी पूर्ण खात्री झाली आहे कीं, माणसांपेक्षां त्यांच्या सहाय्यामुळे मी जीवन जगत आहें. माझी एवढीच इच्छा कीं त्याच्या नामस्मरणांत माझ्याकडून कधींही खंड पडूं नये.

—एक साईभक्त महिला

# श्रीरामकृष्ण महाराज जांभेकर

## एका निष्ठावंत भक्ताच्या आठवणी

(लेखिकाः—श्री. शांताबाई गणपत कामत)

मुंबईत सुमारें चाळीस वर्षांपूर्वी श्री रामकृष्ण महाराज जांभेकर हे अहर्निश लोककल्याणासाठीं झटणारे एक सत्पुरुष होऊन गेले, मुंबईत प्रभादेवी भागांत त्यांचे वास्तव्य सुमारें नऊ वर्षे होतें. तोच त्यांचा लोककल्याण साधनाचा काल. त्या काळांत त्यानीं दु:खें घेऊन आलेल्या अनेक भक्तांची दुःखें दूर केलीं. व त्यांचें जीवन सुखासमाधानाचें केलें. त्यांची पुण्यतिथी या महिन्यांत (मंगळवार दि. २९-१२-७० रोजी) येत असून ती दादर, चांदणे वाडी येथें त्यांच्या भक्तमंडळीकडून मोठ्या समारंभाने साजरी केली जाणार आहे. त्यानिमित्त या आठवणी.

—संपादक

वसंत कुळकर्णी हा माझा भाऊ. तो श्रीजांभेकर महाराजांकडे कधीं कधीं जात असे. त्याला नोकरी धंदा नव्हता. त्याची महाराजांवर श्रद्धा होती. माझी व महाराजांची भेट झाली ती कांहीं कारणामुळें. माझा साडे अकरा महिन्यांचा मुलगा आजारी होता. त्याच्या पोटांत गोवर आलें होतें. शेजारी मेस्त्री नावाचे गृहस्थ रहात असत. त्यांची बायको म्हणाली मुलाला महाराजांजवळून तीर्थ तरी आणून द्या. मी वसंतला तीर्थ घेऊन यायला सांगितलें.

त्याप्रमाणें वसंत श्रीजांभेकर महाराजांकडे गेला. तो गेला आणि मठाचा दरवाजा बंद असल्यामुळें बाहेर बसून राहिला. कांहीं वेळानें महाराजांनीं दरवाजा उघडला व त्याच्याकडे पाहून ते म्हणाले, "कशाला आला आहेस?" "माझ्या वहिणीचा लहान मुलगा गोवर आल्यामुळें बराच आजारी आहे. त्याच्यासाठीं तीर्थ मागायला आलों आहे." वसंत म्हणाला.

महाराजांनीं तीर्थ, अंगारा, पांच केळीं दिलीं. तसेंच रात्रीं अफूचीं बोंडें भिजत घालून सकाळीं त्याच्या पाण्यांत साखर घालून तें रोज नेमाने पाजीत जा, असेंही सांगितलें.

एवढ्यावर न थांबता महाराज म्हणाले "उद्यां सकाळीं मुलास घेऊन या; मग पाहूं आणखी काय करायचें तें!"

वसंतनें आणलेलें तीथ व अंगारा यांचा उपयोग केला.

माझ्या यजमानांचा अशा गोष्टींवर मुळींच विश्वास नव्हता. ते म्हणायचे कीं माणूस काय करणार ? कशाला घेऊन जायचं त्या महाराजांकडे ? कांहीं नको!"

नंतर आजार वाढत गेल्यामुळें त्या अर्भकास इस्पितलांत नेण्यात आलें. त्याच रात्री तेथें त्याचा अंत झाला!

वसंतचें महाराजांकडे जाणे येणें चालू होतें. नोकरी नसल्यामुळें तो फार कंटाळला होता. एके दिवशी तो महाराजांस म्हणाला "वाट पहात रहाण्याचा मला कंटाळा आला आहे, यापुढें फार फार तर एकवीस दिवस वाट पाहीन आणि नंतर समुद्रांत जीव देईन!"

"बरं आहे! नोकरी नाहीं मिळाली तर जीव देणार आहेस ना ? ठीक आहे." महाराज म्हणाले.

आणि या संवादानंतर वसंताला कुवाडेकर यांच्या पावाच्या कारखाण्यांत लौकरच नोकरी मिळाली आणि तो चिंतामुक्त झाला.

माझा मुलगा गेल्यानंतर एकदां महाराजांची भेट घ्यावी असें मला फार फार वाटूं लागलें. सुमारें दोन महिन्यानंतर वसंताबरोबर मी महाराजांच्या भेटीस गेलें.

मी महाराजांस भेटावें असा वसंताचाही आग्रह होता. त्यानें मी आल्याचें महाराजांस सांगितले; तेव्हां तेम्हणाले,

"मुलास मारून टाकलं आणि आतां कशाला आली भेटायला !"

मी काय बोलणार! गप्प राहिलें. महाराजांनीं दोन बौधाच्या गोष्टी सांगून, माझें समाधान केलें; तसेंच "दर शुक्रवारी मठांत येत जा" असेंही सांगितलें.

या काळांत ज्या कांहीं घटना घडून आल्या त्यामुळें माझ्या यजमानांच्या मनस्थितींत थारेपालट घडून आला होता.

मी दर शुक्रवारीं मठांत जायची. दिवसांमागून दिवस व वर्षांमागून वर्षें लोटत होतीं. माझा एक मुलगा पांच वर्षांचा होता. त्याला ताप यायचा व तोंडांतून एकसारखी लाळ गळायची. औषधोपचार चालू होते. गुण येत नव्हता.

महाराज त्याकाळीं वरळीवरील भूतबंगल्यांत रहात असत. तेथें मुलास घेऊन मी महाराजांच्या दर्शनास गेलें. त्यावेळीं महाराजांचें बेचाळीस दिवसांचें अनुष्ठान सुरू होतें. त्या दिवसांत महाराज कोणाशींही बोलत नसत. मला ते नेहमीं ताई या नावानें हांक मारीत असत.

मला पहातांच त्यानीं जवळची पेन्सील व कागद घेऊन "ताईला येथें राहूं द्यावें. घरीं पाठवूं नये." हीं दोन वाक्यें लिहिलीं.

त्यांच्या त्या आदेशाप्रमाणें मी मुलासह तेथें रहाण्याचें ठरविलें.

माझ्या मागोमाग माझे यजमान गुरुचरित्राची पोथी बरोबर घेऊन तेथें आले. महाराजांनीं त्यानांही तेथें रहाण्याचा आदेश दिला.

अनुष्ठानाचा कार्यक्रम वरच्या मजल्यावर चालू होता. त्या दिवशींचा कार्यक्रम आटोपल्यानंतर मुलाला पहाण्यासाठी महाराज आम्ही बसलों होतों तेथें आले. मुलाला मांडीवर घेऊन त्याच्या अंगावरून हळुवारपणें हात फिरविला त्याला हां हां म्हणतां घाम आला. अंगातील ताप निघून गेला. महाराजानीं त्याला पेज द्या म्हणून खुणेनें सांगितलें आणि ते गेले.

या प्रसंगामुळें माझ्या यजमानांचा महाराजांवरील विश्वास दुणावला.

महाराजांच्या इच्छेप्रमाणें तेथें आम्हीं गुरुचरित्राचा सप्ताह साजरा केला. सातव्या दिवशी सर्वांना मिष्टान्नाचें भोजन घातलें. आमच्या शेजारीं श्री. सावंत नावाचे गृहस्थ रहात असत. तेही महाराजांचे भक्त होते. आम्हीं व त्यांनीं मिळून या सप्ताहाचा खर्च केला. हें कार्य संपवून आम्ही घरीं आलों.

त्यानंतर दोन वर्षांचा काळ मागें पडला. महाराजांच्या दर्शनास दर शुक्रवारी मी नित्यनेमानें जात होतें. अशाच एका शुक्रवारीं त्यांच्या मठांत माझ्या लहान मुलास व भावास घेऊन गेलो. मी त्यावेळीं पांच महिन्याची गर्भार होतें. मला आठवतें कीं तो दत्तजयंतीचा दुसरा दिवस होता. महाराजांची भेट झाली नाही, ते आपल्या एका मुसलमान भक्ताकडे गेले असल्याचें समजलें. मी मुलासह तेथून निघाले. लालबागेंत आम्हीं गाडींतून उतरतांच भाऊ पुढें गेला होता त्याच्यामागून माझा मुलगा पेपरमिंट घेण्यासाठी धांवत धांवत रस्ता ओलांडीत असतां त्याला मोटरीचा धक्का लागून तो जमिनीवर आदळला व बेशुद्ध झाला. मीही त्यांच्याबरोबर धांवल्या मुळें मलाही जबरदस्त धक्का बसला. त्या गाडीत सिनेमा नटी श्रीमती ललीता पवार व इतर नट मंडळी होती. त्यांनी आम्हांला आपल्या गाडीत घालून के. ई. एम्. हॉस्पिटलमध्यें पोहोचविलें. तेथें जरूर त्या उपचारांनंतर आम्हांला पोलीस ठाण्यावर नेण्यांत आलें. घरी येईपर्यंत रात्रींचे अकरा वाजून गेले होते.

महाराज एका मुसलमान भक्ताकडे गेले असल्याचें सांगितलेंच आहे. महाराज तिकडे असतां त्यानीं एका कपड्याला आग लागून तो पेटूं लागल्याचे पाहिले. तेवढ्या वरून महाराजांनीं कयास बांधला कीं, कुठें तरी माझ्या भक्तावर संकट ओढवलें आहे. महाराज तसेच आपल्या मठांत आले आणि नंतर आमच्या शेजारी असलेले

श्री. सावंत यांच्या घरी आले. तेथें माझे बंधू यांच्याकडून अपघाताची सर्व हकीगत त्यांना समजली.

नंतर त्यांनी मला व मुलाला बोलावून घेतलें. आम्हाला धीर देऊन महाराज म्हणाले, " ताई ! माझ्यावर तुझा विश्वास आहे ना ? "

" होय; माझा आपल्यावर संपूर्णपणें विश्वास आहे."

" मग मी सांगतो तो औषधोपचार करा, डॉक्टरकडे जाण्याची जरूरी नाहीं ! कडू निंबाचा पाला आणा व त्यांत तुरटी आणि हळद घालून त्याचा वाटून चांगला लगदा करा. आणि मुलाला तोंडावर व इतर ज्या ज्या भागावर जखमा झाल्या आहेत तेथें तेथें त्या लगद्याचा लेप करा. याप्रमाणें रोज करीत जा."

महाराजांनीं सांगितल्याप्रमाणे आम्हीं सतत तीन महिने लेप केला आणि मुलाच्या सर्व जखमा बऱ्या झाल्या.

माझ्या गर्भारपणाचा आतां आठवा महिना सुरू झाला होता. मला मोटारीचा धक्का लागल्याचें यापूर्वी सांगितलेंच आहे. माझ्या पोटांत फार दुखू लागलें. कळा सहन होत नव्हत्या. अशा स्थितींत मला हास्पिटलांत नेण्याचें ठरलें. वसंतकडून महाराजांस सर्व माहिती समजत असे. त्यांनीं निरोप पाठवून कळविलें कीं, हॉस्पिटलांत जाण्यापूर्वी आम्हीं एकमेकांस भेटावें.

एवढी इच्छा प्रदर्शित करून स्वस्थ न रहातां महाराज लालबाग येथील हळदणकर फोटो स्टुडिओंत आले व वसंत बरोबर निरोप पाठवून मला तेथें बोलावून घेतलें.

त्याप्रमाणें मी महाराजांच्या भेटीस गेलें. त्यानी अगत्यपूर्वक माझी चौकशी केली व टेबलावरील ग्लास माझ्या हातीं देऊन म्हणालें," हें औषध पिऊन टाक ! "

मी कोणतीही शंका मनांत न आणतां तें ग्लास रिकामें करून टेबलावर ठेविलें.

नंतर मला समजले कीं महाराजानी तेथें येतांच त्या ग्लासांत लघवी करून ठेविली होती !

त्यामुळें काय झालें? माझ्या पोटांतून येणाऱ्या कळा एकदम थांबल्या !

नंतर मी हॉस्पिटलांत गेलें, व कांही दिवसांनंतर बाळंत झालें, त्या मुलाच्या ओठावर जखमा झालेल्या व ओठ फाटल्यासारखे दिसत असत. महाराजांनीं त्या मुलास पाहिलें.

त्यानंतर कांहीं दिवसांनीं महाराज अक्कलकोटला गेले व तेथें माझ्या मुलासाठी त्यानीं सप्ताह केला. महाराजांच्या कृपेनें नंतर त्या मुलाचे ओठ अगदीं ठीकठाक झाले.

महिन्यांकामागून महिने लोटत होते. माझ्या मुलास सातवा कीं आठवा महिना सुरू झाला. तो मधून मधून आकडी आल्यासारखें करूं लागला. महाराजांचें जन्मापूर्वीपासून त्याच्यावर लक्ष होतें. त्याच्यासाठीं ते फार झटत होते.

मुलगा आजारी झाल्याचें समजतांच महाराज आमच्या घरीं आले. मुलास आपल्या मांडीवर घेऊन त्याला कुरवाळीत बसले. तेथें त्यांना दृष्टांत झाला कीं येथें बसून काय करतोस? आपल्या मठांत जा!

त्याप्रमाणें महाराज तेथून उठले आणि आपल्या मठांत निघून गेले. ते बेचैन झाले होते. त्यांनी मठांत गेल्याबरोबर आम्हां सर्वांना आपल्याकडे बोलावून घेतलें. तेथें आमच्याकडून त्यानीं सप्ताह करवून घेतला.

सप्ताह संपला आणि त्याच दिवशीं दुपारीं बारा वाजतां मुलानें प्राण सोडला!

त्या दुर्धर प्रसंगामुळें मला अनावर दुःख झालें. हें का सांगितलें पाहिजे? जमिनीवर डोकें आदळून घेणार इतक्यांत महाराज तेथें आले,

मला उद्देशून ते म्हणाले, "मला हें सर्व माहीत होतें. म्हणूनच तर तुम्हांला येथें माझ्याजवळ बोलावून घेतले, दुःख करूं नकोस! तो मुलगा तुझा नव्हता. तो देवाचा होता. तो देवाघरीं निघून गेला; त्याचें दुःख कां म्हणून करायचें!"

महाराजांच्या त्या शब्दांनीं माझा दुःखभार हलका झाला, महाराजांचे शब्द लक्षांत बाळगून आपण दुःख करायचें नाहीं असा मी निर्धार केला.

# वाचकांचा पत्रव्यवहार

## शिरडीच्या साईबाबांचा अवतारः—

हल्ली नानाप्रकार पहावयास मिळतात. कोणी आपल्याला सत्यसाई म्हणवतात. मीच साईबाबांचा अवतार आहे, असें म्हणण्याचे धाडस करितात, त्यांच्या जवळ साईनाथांची वागणूक, शिकवण, आचार, विचार ह्यांतले एखादे तत्व तरी आहे का ? साईनाथांनी उभा मानवी. जन्म मांजरपाटाच्या कपड्याच्या सोबतीला काढलान मातीच्या भांड्याखेरीज कांहीं उपयोगांत आणले नाहीं. मानवधर्माची सतत शिकवण दिली; डामडौल, ख्यालीखुशाली याचे तर त्यांना वावडे होते. त्याच्या अगदी उलट सत्यसाईचे आहे. मला जास्त खोलांत जावयाचे नाहीः पण माझे सत्यसाईनाथांस आव्हान आहे. की त्यानीं शिरडीक्षेत्री येऊन श्रीसाईनाथांच्या समोर मी अवतार कसा आहे, हे जारही प्रगट करावें आतांपर्यंत अनेक ज्येष्ठ संत होऊन गेले. संत श्रीज्ञानेश्वर, संत तुकाराम, रामदास, एकनाथ यांनी अवतार पुन्हा घेतल्याचे कोणाचेही ऐकिवांत नाहीं. साईनाथ हे सुद्धा संत होते, मग ते पुन्हा अवतार कसा घेणार ? अवतार घेतला हे नितांत असत्य आहे. न्यायमूर्ती रेगेसाहेब यांचेंही मत अवतार नाहीं असेच आहे. विचारवत बुद्धिमान लोक आपल्या बुध्दीशीं प्रतारणा करतांत हेंच समजत. नाहीं उदी काढणें आंगठ्या काढून दाखविणें ही एक वेगळीं विद्या आहे. साईनाथ मानवी देहांत असतांना कुशाभाऊ मिरजकर (कृष्णनाथमहाराज) असले प्रकार करीत असत ( अजूनही पुष्कळ लोक हातांतून उदी काढतात ) त्यांना द्वारकामाईत येण्यास बंदी होती. सोने आणि पितळ यातला फरक आपण समजला पाहिजे. श्रद्धा सुद्धां पारखून ठेवावी. अंधश्रद्धा नको, ती कामाला येणार नाहीं. खरे शिरडीचे सत्य सोडून बेगडी सत्याचे मागे लागू नये ही विनंती आहे.

साईनाथ आपल्याशी बोलावेत असें जर वाटत असले तर निष्काम कर्मयोगाचा अवलंब करावा लागेल, तरच हे शक्य आहे. एरव्ही शक्य नाहीं. ही एक खडतर तपश्चर्या आहे. ती सर्वांनाच साधेल असे नाहीं. प्रयत्न करून पहावा.

तरी अशा भूलथापा मारून प्रदर्शन करणाऱ्यांपासून खऱ्या शिरडीच्या साईभक्तांनीं दूर राहावयास नको का ?

साईनाथांचा पुन्हा अवतार हे अशक्यकोटीतले आहे, हे ठाम समजावें.

आपला

**वामन रंगनाथ गोखले**
साईभक्त शिरडी क्षेत्र

# तीन स्तोत्रें---

## श्रीविठ्ठलस्तोत्र

[ कविः---शाहीर श्री. खाडिलकर एम्. ए. बी. टी.

कविवर्य शाहीर पां. द. खाडिलकर एम्. ए. बी. टी. यांनीं आपल्या हृदयस्पर्शी पोवाड्यांनीं एकाकाळीं सारा महाराष्ट्र गाजवून सोडलेला आहे. पोवाडे गायन ऐकावें तर शाहीर खाडिलकरांचे.त्यांनीं श्री विठ्ठल, श्री रामचंद्र व श्रीकृष्ण ह्या आमच्या तीन देवतांवर सुबोध व मुखोद्गत करण्याचा कोणालाही सहज मोह व्हावा अशीं पुढील स्तोत्रें रचिलीं आहेत एवढे सांगितलें म्हणजे पुरे.

संपादक

(वृत्त–भुजंगप्रयात)

गळां वैजयन्ती रुळे रम्य माळा।
कटीं हात ठेवोनिया सिद्ध झाला; ।।
पहा पुंडलीकार्थ धावोनि आला।
नमस्कार माझा तया विठ्ठलाला. ।। १ ।।
शोभे शिरीं दिव्य किरीट फार।
कानीं तसे कुंडल शोभणार; ।।
नसे तुला ज्या मुखपंकजाला!
नमस्कार माझा तया विठ्ठलाला ।। २ ।।
मृदंग टाळा झडती झणाणा।
श्री विठ्ठलाच्या भजनांत वीणा; ।।
असंख्य सद्भक्त रमोनि गेला।
नमस्कार माझा तया विठ्ठलाला ।। ३ ।।
नको तीर्थ यात्रा अति क्लेशदायी।
नको यज्ञ यागादि कर्मेंहि कांहीं; ।।
सदा सुस्मरा पंढरीच्या प्रभूला।
नमस्कार माझा तया विठ्ठलाला ।। ४ ।।

कुठें होय वैकुंठ ठाऊक कोणा ?।
कुठें होय कैलासिचा सांबराणा ॥
अम्हां मुक्ति देण्या सदा सज्ज झाला।
नमस्कार माझा तया विठ्ठलाला ॥ ५ ॥

किती निंद्य पापी तुवां उद्धरीले
करोनी कृपा ते भवी तारियेले ॥
धांवोनियां ये मज तारण्याला
नमस्कार माझा तया विठ्ठलाला ॥ ६ ॥

पिता मला तूं जननी मला तूं
बंधू सखा सर्वहि ते मला तूं ॥
अनन्यभक्तीवश जो जहाला
नमस्कार माझा तया विठ्ठलाला ॥ ७ ॥

पाहोनियां वत्स भुकेजलेले
धांवे जशी माय त्यजोनि सारे ॥
तूं धांवसी ताप निवारण्याला
नमस्कार माझा तया विठ्ठलाला ॥ ८ ॥

अनंत पापें करुनी दयाळा
येती तुझ्या जे पदवंदनाला ॥
तरोनियां ते वरिती सुखाला
नमस्कार माझा तया विठ्ठलाला ॥ ९ ॥

हें विठ्ठल स्त्रोत्र सुरम्य गाती
भवार्णवी ते नर मुक्त होती ॥
अखंड सौभाग्य मिळेल त्याला
नमस्कार माझा तया विठ्ठलाला ॥ १० ॥

# श्रीरामस्तोत्र.

## ( वृत्त—शिखरिणी )

विपद्ग्रस्ता लोका असुखहर आधार बरवा
तुझा वाटे देवा ! म्हणुनि पदिं चित्तासि रमवा ॥
नसे कोणी तेव्हां सुहृदसुतदारादि मजला
म्हणोनी या दीनावरि करी दया श्रीरघुवरा ! ॥ १ ॥

किती जीवां येते मरण जगतीं या प्रतिदिनीं
दिसे हें डोळ्याला विषय परि येती मम मनीं ॥
असा झालों देवा ! निमिषसुखिं मी लंपट खरा
म्हणोनी या दीनावरि करी दया श्रीरघुवरा ! ॥ २ ॥

तुला पाहो नेत्र, श्रवण गुण कर्णद्वय करो
वदो जिव्हा देवा स्तवन, तव नामीं मन विरो ॥
करो पूजा हस्त द्वय, मज असा नान्य दुसरा
म्हणोनी या दीनावरि करी दया श्रीरघुवरा ! ॥ ३ ॥

किती पापी झाले तव वरगुणें मुक्त सदया !
कुजन्मांचा फेरा चुकवुनि दिलें मोक्षनिलया ॥
दयाळा ! मी पापी किती तरि तयाहूनि दुसरा
म्हणोनी या दीनावरि करी दया श्रीरघुवरा ! ॥ ४ ॥

सुखाचे हे लोक, व्यथित जगिं झाला नर जरी
तरी तो एकाकी, सकल मग जाती जन दुरी ॥
कळों आलें देवा ! शरण तुज आलों सुरवरा
म्हणोनी या दीनावरि करि दया श्रीरघुवरा ! ॥ ५ ॥

विपत्काळीं देवा ! तुजविण मला कोण दुसरा
असे आधाराला ? शरण तुजला मी रघुवरा ॥
करी चित्ता शांत व्यथित करि तें शांतिसदना !
दयाळा, या दीनावरि करी दया दीनरमणा ! ॥ ६ ॥

विकारी हें माझें मन मज सदा गांजित असे
सदा चिंता देहा निशिदिनिं दयाळा ! छळितसे ॥

असा झालों त्रस्त, प्रभुवर ! वदूं संकट कुणा ?
दयाळा, या दीनावरि करी दया दीनरमणा ॥ ७ ॥

जगीं मी संसारीं निशिदिनिं सख्या ! कर्म करितों
मुलें बाळें माझीं मम मम करोनीच झुरतों ॥
स्मरेना मी देवा ! पळभर तुला पद्म वदना !
दयाळा, या दीनावरि करि दया दीनरमणा ! ॥ ८ ॥

वृथा माझें गेलें शिशुपण तसें बाल्य पुढती
कुमारावस्था ही सकल सरली व्यर्थ जगतीं ॥
निघालें हें आतां तरुणपण ही लाज न मना
दयाळा, या दीनावरि करी दया दीनरमणा ॥ ९ ॥

जरी माझे देवा ! निशिदिनिं मला दोष कळती
कसे ते टाळावे न च मज कळे दीन कुमती ॥
वदूं विश्वधारा, तुजविण असें संकट कुणा
दयाळा या दीनावरि करी दया दीनरमणा ! ॥ १० ॥

# श्रीकृष्णस्तोत्र

## ( वृत्त—शिखरिणी )

कराया साधूंचें विपद हरुनी रक्षण पुरें
कराया दुष्टांचें कुमुदवदना ! दंडन बरें ॥
युगामाजीं देवा. धरिसि अवतारा प्रभुवरा !
नमस्ते गोपाला, यदुकुलवरा ! संभ्रमहरा ! ॥ १ ॥

कराया गोपांचें अवन तयि गोवर्धन गिरी
दयाळा ! श्रीकृष्णा ! उचलुनि तुवां कोमल करी ॥
जगा ऐशी लीला प्रकट करिसी रुक्मिणिवरा !
नमस्ते गोपाला, यदुकुलवरा ! संभ्रमहरा ! ॥ २ ॥

रणक्षेत्रीं भीष्मादिक निज सखे गोत्रज पुढें
लढाया आलेले बघुनि मनि पार्थी भ्रम चढे; ॥

परि त्वकौशल्यें विजय हृदयीं तो न उरला
नमस्ते गोपाला, यदुकुलवरा ! संभ्रमहरा ! ॥ ३ ॥

सभेमाजीं दुःशासन द्रुपदकन्या सुनयना
कराया नग्नस्त्री नरपशु करी वस्त्रहरणा ॥
सतीला रक्षाया प्रकट दिससी तूं प्रभुवरा ! ।
नमस्ते गोपाला, यदुकुलवरा, संभ्रमहरा ! ॥ ४ ॥

कराया कंसानें यदुवर, तुझें कंदन पुरें ।
वृथा कारागारीं विमल वसुदेवासि रुधिलें ॥
पिता माता दोन्ही करिसि परि तूं मुक्त अमरा ।
नमस्ते गोपाला, यदुकुलवरा, संभ्रमहरा ! ॥ ५ ॥

बघोनी भक्तीचा अनुपम असा उत्कटपणा
प्रभो, तूं पार्थाला वश, यदुवरा, भक्तरमणा ! ॥
तयाचे सारथ्य प्रभुवर, तुझें, गूढ मजला
नमस्ते गोपाला, यदुकुलवरा, संसृतिहरा ! ॥ ६ ॥

तुझ्या ठायीं देवा चपल मन हें गुंतवुनियां
सुखानंदी व्हावे सतत रत ही आस सदया ! ॥
समर्था ! मच्चित्ता विषय परि नेती न कळतां
अनंता, श्रीकांता, अमलजनगीता, अकलिता ! ॥ ७ ॥

वसंतीं वृक्षांना नवकुसुम पर्णे विरुदती
तसें वर्षाकालीं जलद जल देण्या विहरती ॥
तुवां सृष्टी केली निशमित पुरी यादवसुता !
अनंता, श्रीकांता, अमलजनगीता, अकलिता ! ॥ ८ ॥

तुझ्या नामें झाले पतित नर ते पावन किती
तुझे शत्रू कंसादिक अमितही मुक्त जगतीं ॥
म्हणोनी मुक्तीची मजहि दृढ आशा प्रभूवरा !
नमस्ते, गोपाला, यदुकुळवरा, संसृतिहरा ! ॥ ९ ॥

घनश्यामा, कृष्णा, कमलनयना, यादववरा
धराधारा राधारमण, रमणीया सुरवरा ॥
मुरारे, कंसारे, उदधितनयानाथ, अमरा
नमस्ते गोपाला, यदुकुलवरा, संभ्रमहरा ॥ १० ॥

समाप्त

# आपत्तीचें समर्थन

**लेखक :** हे. घ. कुळकर्णी
वनावल ( धुळें )

संपत्सु महतां चित्तं भवत्युत्पलकोमलं
आपत्सु च महाशैलशिलासंघातकर्कश ॥

थोरांचें चित्त संपत्काली कमलाप्रमाणें कोमल असतें. पण, आपत्काली तें गिरिशिलेप्रमाणें कठिण असतें.

संसार हा असा काही विचित्र आहे, त्यांत नेहमी नसत्या भानगडी व उलाढाली होत असतांत. त्यांत आपण स्थित्यंतरें किंवा दुर्दैवाचें भोग मुळीच येऊ देणार नाही असे कोणी म्हणेल तर तें शक्यच नाही. संसार म्हटला म्हणजें संकटें हीं ठरलेलीच. आता संकटांत मात्र भेद आहेत.

१ ) सूचनार्थक संकटें. २ ) परीक्षार्थक. ६ ) काल्पनिक.

१ ) **सूचनार्थक संकटें:**—बहुदा प्रत्येक दुःख येतें तें कृतकर्माचे दण्डार्थ असतें किंवा आगामी संकटाचें परिहारसूचक असतें. "पुढच्यास ठेच मागचा शहाणा" अर्थात एकाचें दुःख दुसऱ्याच्या सुखास कारण होतें. कालिदास म्हणतात, "दुःखानी व संकटांनीच आम्हाला इतकें शहाणें केलें आहें, कीं हीं संकटें जर नसती तर आम्ही मूढ व गैरसावध राहून केव्हाच नामशेष झालो असतो. पण ही संकटें आम्हाला टक्कर देऊन घट्ट बनवितात. आणि त्यामुळेंच आम्हांला ह्या जगांत टिकाव धरून राहतां येतें. त्यामुळेंच आम्ही आत्मरक्षणाचे नाना उपाय शोधुन काढितो. व दक्ष राहतों." व्यापारांत थोडी फसवणुक झाली असतां व्यापारी लोक म्हणतात, 'जाऊं द्या की थोडक्यांतच अक्कल विकत घेतली.' हे म्हणणें अक्षरशः खरें आहें.

२) **परिक्षार्थक संकटें:**–संकटांचा दुसरा वर्ग म्हणजें परिक्षार्थ आलेलीं संकटें होत. परमेश्वर पुष्कळ वेळा मनुष्याचें सत्व पारण्यासाठीच संकटें पाठवीत असतों. आपला भक्त कितपत संकटें सहन करतों व आपल्या कसोटीला तो उतरतो अथवा नाहीं हा हेतु त्यामागें असतो. मात्र अंत पहात नाही. याचे उदाहरण म्हणजें प्रल्हाद, ध्रुव, हरिश्चंद्र, नळ इत्यादी सत्पुरुषावर संकटे जर आलीं नसतीं, तर त्यांची खरी किंमत जगांत उरली नसती. अर्थात संकटानीच ह्या सत्पुरुषाना महत्पदावर पोहचविलें हे निर्विवाद सत्य आहें. व अशी संकटें आणण्यांत परमेश्वरराचा हेतु असतो हें उघड आहे. "दारिद्र्य परमांजनं" म्हणून एक म्हण आहें. ती खोटी नाही. सत्ता व वैभव मनुष्याला उन्मत व अंध करीतात.

आपत्तीचा दुसरा फायदा म्हणजे मित्राची परिक्षा. म्हटलेंआहें की, " आपत्सु मित्र जानीयात साथीच विभवक्षये" म्हणजेंच मित्राची खरी परिक्षा आपत्काली व स्त्रीची परिक्षा गरिबी आली असतां होते. एक म्हण आहे की, ' संपत्ती मित्र मिळवी आपत्ती पारखी तयां ।' ती खरी आहें. आपत्तीनें कधी कधी खरेंखुरें स्नेही असतील तेच एकत्र राहातात. व ढोंगी निघुन जातात. राष्ट्रीय कामांत देखील आपत्तीने समान वृत्तीचे लोक वेचकें पुढें येऊन एकत्रीत होतात. हा आपत्तीक उपकारच आहे.

रात्रीचा अंधार जसजसा अधिक गडद होत जातो, तसतशी नक्षत्रें अधिकच झळकूं लागतात. घनपटलानें आकाशाला सोभा चढतें. मोठमोठ्या उद्योगी शहरातून धुकें व धूर यांची दिवसभर गर्दी असते; आणि ज्यांना कोणत्याहि परिस्थितीत आनंदी वृत्ति ठेवण्याची किमया सापडली नसेल अशांना उदासीनतां येते. परंतु दिवसा जेथे असें हवामान असते, तेथे सूर्यास्त समय फारच रमणीय असतों व जे अवलोकनशील आहेत अशाना ते पाहून फारच सुख होते.

एकदां सैतानाने एका शेतकऱ्याची छळणा मांडली त्याचा परिवार व संपत्ती सर्व हरण केली. शेतकऱ्याला पुष्कळ मुलगे व मुली होत्या तसेंच पुष्कळच गाई, म्हशी, बैल गाड्या व अनेक नोकर चाकर असा परिवार होता. सैतानानें हा सर्व हरण केला. परंतु शेतकरी अत्यंत हुशार होता. त्यानें ह्या परिस्थितीमुळे डगमगून न जाता, स्वतःची लंगोटी फाडून व डोके मुंडून, देवाला लोटांगण घातलें व प्रार्थना केली की, "हे देवा मी उघडा नागडा या जगांत आलो आणि आतां तसाच परत जाणार त्यांत खेद तो काय ? आजपर्यंतचे वैभव तूंच दिले होतेस आणि तुझें तुच नेलेस. तुझी मर्जी. माझी कांही फिर्याद नाही. तुझ्या नांवाचा नेहमी जयजयकार असो." अखेर त्याचे वैभव त्याला परत मिळालें. किंवहुना पहिल्यापेक्षांही जास्त. पण त्यांचे त्याला काय?

**उदये सविता रक्तो रक्ताश्चास्तमये रविः ॥**
**संपत्त च विपत्त च महतामेकरूपता ॥**

—सूर्य जसा उदयकाली तसाच अस्तसमयीहि रक्तवर्णच असतो. तद्वतच खरे थोर जे असतात, ते संपत्तीत व विपत्तीत एकरूपच असतात.

हे जगच असे आहे की, त्यांना एवढ्या तेवढ्या अपयशानें खट्ट होऊन जो खाली बसला, तो साफ बुडाला. "अभ्यासः कर्मणां सम्यम् । उकत्पादयति कौशलम् ।" म्हणजें अभ्यासाने कोणत्यांहि कामी कुशलतां येतें. यास्तव फजिती झाली तरी पाट सोडू नये. विघ्नें आली तर त्याला न भिता, नेहमी ईश्वर चिंतन करीत राहून त्यांचा पाठपुरावा करीत राहिलें म्हणजेच ती नष्ट होतील.

३ )**काल्पनिक संकटे** --कांही लोकांना साप साप म्हणून दोरी धोपडण्याची संवयच असते. एवढयातेवढया साध्या गोष्टीवरूनही त्यांचा जीव कासावीस होतो. पहावें तो त्यांत कांहीही नसतें. क्षुल्लक कारणानें ही बेजार होतात. नजरेस कोळी पडलां तर पूर्णपणे न पाहतां विंचू म्हणून घर दणाणून सोडतात. अशीही कांही माणसें असतांत. अशांना आपलें कवि कालिदास म्हणतात--

नसें कीर्ति- हाती नसे प्रेमभंग । फुकां अश्रुका गाळतोसी सवंग ॥
म्हणें चाललो आजफार । हवा सुटली झोंवतें थंडगार ॥

सारांश-- माणसावर किती ही व कशा प्रकारची संकटें आली तरी न भित ईश्वरांचे अखंड नामस्मरण करून त्यांना तोंड दिलें असतां विघ्नाचा नाश होतो. हे उघड सत्य आहे. म्हणूनच म्हणतात-

बलवत्तर विधि देतो थोराला थोरल्याचि तापातें ।
इंद्रप्रमुख सुरांसहि जे भावि न लंघवेति बापाते ॥ १ ॥
अनुकूल काल होतो तेव्हां बळ बुद्धी तेज यश देतो ।
प्रतिकूल तोचि होऊनी माघारें दत्त सर्वहि घेतो ॥ २ ॥
देतो तसाची घेतो फिरूनी हिरूनी सर्व काळ बाळकसा ।
याच्या उतरेना जन सित बाल तसाचि काल बाल कसा ॥ ३ ॥

# मीलन अर्थात जिवा शिवाची भेट

तुझी साईशा आठवण येता घळघळ अश्रू वहाती ।
अगतिक होउनी स्थिती मनाची उपाय काही न सुचती ॥ १ ॥
अससि तू तिथे आणि मी इथे दूर अंतरावरती ।
पंखही न ते धाव घ्यावया माझ्या अंगावरती ॥ २ ॥
तुझी सावळी मूर्ति तरळते माझ्या अवती भवती ।
तसेच रूप तें असे कोरिले माझ्या हृदयावरती ॥ ३ ॥
विरह तुझा हा मज न साहवे जीव येई काकुळती ।
दया मजवरी करील कुणी का तुझ्याविना या जगती ॥ ४ ॥
कसे कुणाते हृदगत मनिचे कथू बसुनि सांगाती ।
अशा समयी मग राहराहुनी ओठी शब्द घुटमळती ॥ ५ ॥
विचार माझे तुझ्या भोवती असे सारखे फिरती ।
जीव तळमळे रात्रदिन हा तुझ्याच मिलनासाठी ॥ ६ ॥

पान १६ वरून

श्रीकेळकर महाराज हें जग सोडून गेल्यानंतर मी समाधिस्थानीं त्यांच्या पुण्यतिथीच्या वेळीं येतों. त्यावेळीं मी एकटाच येत नाहीं तर आमचें एक भजनी मंडळ—श्रीराम प्रासादिक भजनी मंडळ—म्हणून आहे तें घेऊन येतों.

माझे शेजारी श्रीजांभेकर महाराजांचे भक्त गंगाराम वालावलकर यांची हकीकत सांगायची राहिली. ते निष्ठापूर्वक महाराजांची पूजाअर्चा, आरती, नैवेद्य वगैरे करायचे. त्यांचा बहुतेक वेळ त्यांतच खर्च व्हायचा. त्यांच्यामागें दुसरा व्याप नव्हता. त्यांच्या घरीं कांहीं गुजराथी रोजगार धंदेवाले नेहमीं यायचे. त्यांच्या मनकामना पूर्ण व्हायच्या. गंगारामबुवांचा सर्व खर्च तेच चालवायचे. ते कधीं कधीं श्रीकेळकर महाराजांच्या भेटीस जायचे; परंतु श्रीकेळकर महाराज माझ्या घरीं आले तरी शेजारींच रहाणाऱ्या गंगारामकडे सहसा जात नसत. ते म्हणायचे, "त्याचें ठीक चाललं आहे. त्याच्याकडे जाण्याची जरूरी नाहीं. मला गरीबांकडे व जे अडचणीत असतील त्यांच्याकडे जाणें जरूर वाटतें."

# शिरडी----वृत्त

## ( आक्टोबर–१९७० )

या महिन्यांत श्रीसाईबाबा पुण्यतिथी दसरा उत्सव आल्यामुळें व दिवाळीचा सण आल्यानें बाहेरगांवचे भक्तांची गर्दी बरीच होती. तसेंच शाळा कॉलेज यांना सुट्टी असल्यानें मुलांमुलींच्या सहलीही बऱ्याच आल्या होत्या. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली. ती खालीलप्रमाणें :–

कीर्तनें

श्री. ह. भ. प. हरिकृष्ण काणे. गणेशवाडीकर कीर्तनकार

मु. गणेशवाडी. जि. कोल्हापूर.

श्री. ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे मु. शिर्डी कीर्तन.

श्री. संस्थानगवई यांची कीर्तनें नेहमींप्रमाणें झालीं.

**प्रवचन**

श्री. डॉ. के. बी. गव्हाणकर, इंदिरानिवास, मु. कुर्ला ( मुंबई )

**गायन व भजन**

श्री. शशिकांत पुसाळकर मुंबई

श्री. गंगाधर नरसिंह सामंत मुंबई

श्री. जे. गोपिनाथ कुर्ला

श्री. काशिनाथ बी. चव्हाण कुर्ला

श्री. शंकर परशुराम थखळ घाटकोपर मुंबई

श्री. सौ. मिराबाई राज गोपाळ स्वामी. खार मुंबई

श्री. नरहरी रामचंद्र कवीश्वर इंदौर म. प्र.

**लोकनाट्य**

श्री. रघुवीर खेडकर आणि कांता सातारकर मंडळी मु. संगमनेर ( नगर )

शिर्डी येथील हवा उद्यम आहे. कोणत्याही प्रकारची रोगराई नाहीं पुण्यतिथी उत्सव अहवाल स्वतंत्र दिला आहे. त्यामुळें यात तो कार्यक्रम दाखल नाहीं.

## दिवाळी—लक्ष्मीपूजन

संस्थान रिसिव्हरसाहेब माननीय श्री. का. सी. पाठक यांच्या शुभहस्तें श्री महालक्ष्मीसरस्वतीपूजन प्रति वर्षाप्रमाणे थाटांत पार पडले. तसेंच सर्व नोकर. सेवेकरी व भक्तमंडळीस तीन दिवस बुंदीचे लाडू, चिवडा वगैरे फराळ प्रसाद म्हणून देण्यांत आला. दिवाळीचे दोन तीन दिवस सर्वांनी आनंदांत घालविले.

## कोजागरी पौर्णीमा—

रात्री श्रीचे समार्धास तुळसी अर्चन व चंद्रपूजा डॉ. देशपांडे यांच्याहांस्तें झाली. तसेंच डॉ. के. बी. गव्हाणकर यानीं इतर मंडळीच्या सहकारानें भजन, गायन वगैरे कार्यक्रम यशस्वी रीतींनें पार पाडून रात्रभर जागर केला. कार्यक्रमांमुळें रात्र आनंदात पार पडली. सर्वांना तीर्थ प्रसाद देण्यांत आला.

**Books published and sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

## श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेलीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ५-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | — |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ५-२५ |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ६-०० |
| (६) | A Glimpse of Indian Spirituality-by Pradhan | | | १-५० |
| (७) | A Glimpse of Indian Spirituality (Telugu) | | | १-०० |
| (८) | श्रीसाईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-७५ |
| (९) | साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (१०) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (११) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१२) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | श्रीरुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१४) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१५) | श्रीसाईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (१६) | Guide to Shirdi | (English) | | ००-१२ |
| (१७) | स्तवनमंजिरी व सुमनांजलि | (मराठी) | | ००-२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 P. and 50 P. for No. 1. Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* :

1. **Receiver Shri Sai Baba Sansthan,**
   **P. O. Shirdi., Dist. Ahmednagar.**

2. **Sai Baba Office 'Sai Niketan,'**
   **Dr. Ambedkar Road, 804 B, Dadar, Bombay 14.**